# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,

## नाशिक – ४२२२२२

### शिक्षणशास्त्र विद्याशाखा

### बी.एड. शिक्षणक्रम माहितीपुस्तिका (P80)

### शैक्षणिक वर्ष : २०१८ - २०२०

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | बी.एड. शिक्षणक्रमाच्या माहितीचा तपशील | पान.क्र. |
|---|---|---|
| भाग I | **बी.एड. प्रवेशासंदर्भात मह-त्वपूर्ण सूचना** | ०३ |
| भाग II | **बी.एड. प्रवेशासंदर्भात माहिती** | ०४ |
| | **मुक्त विद्यापीठाविषयी थोडेसे** | ०४ |
| १) | विद्याशाखा परिचय | ०४ |
| २) | शिक्षणक्रमासंबंधी माहिती | ०४ |
| ३) | हा शिक्षणक्रम कोणासाठी ? | ०५ |
| ४) | एन.सी.टी.ई. प्रवेश नियम | ०५ |
| ५) | जिल्हानिहाय जागा | ०५ |
| ६) | अतिरिक्त जागा | ०५ |
| ७) | आरक्षण तक्ता | ०५ ते ०६ |
| ८) | शिक्षणक्रम प्रवेश पात्रता | ०७ |
| ९) | प्रवेश अपात्रता | ०७ |
| १०) | प्रवेश अर्ज कसा भरावा ? | ०८ ते ११ |
| ११) | प्रवेश प्रवाही तक्ता | ११ |
| १२) | निवड प्रक्रिया | ११ ते १४ |
| १३) | शिक्षणक्रमाचे विविध अभ्यासक्रम | १४ ते १६ |
| १४) | संपर्कसत्रे | १६ ते १७ |
| १५) | अंतिम परीक्षेसाठी पात्रतेच्या अटी | १७ |
| १६) | विद्यार्थी मूल्यमापन | १७ ते १८ |
| १७) | शिक्षणक्रम शुल्क | १८ ते १९ |
| १८) | विभागनिहाय व जिल्हानिहाय अभ्यासकेंद्रे | १९ ते २२ |
| १९) | विशेष नोंदी | २२ |
| २०) | संपर्कासाठी पत्ते | २२ ते २३ |
| भाग-III | **बी.एड. प्रवेशप्रक्रियेत संगणकाचा वापर** | |
| २१) | प्रास्ताविक | २३ |
| २२) | बी.एड. प्रवेशप्रक्रियेत माहिती तंत्रज्ञानाचा वापर | २३ ते २४ |
| २३) | बी.एड प्रवेश अर्ज भरण्याविषयी | २४ ते ३९ |
| | **परिशिष्टे** | |
| १) | जातनिहाय आरक्षण | ४० |
| २) | दिव्यांग विद्यार्थी प्रवेश कार्यपद्धती (बी.एड.) | ४१ |
| ३) | मान्यताप्राप्त प्रयोगशील शाळा यादी | ४२ |
| ४) | प्रवेश-अर्ज पत्र | ४३ ते ४९ |
| ५) | मेंटार मान्यता पत्र | ५० |
| ६) | बी.एड. शैक्षणिक वेळापत्रक | ५१ |
| ७) | नमुना प्रवेश अर्ज | ५२ ते ५३ |

## भाग- I - बी.एड. प्रवेशासंदर्भात महत्त्वपूर्ण सूचना

★ **महत्त्वपूर्ण सूचना**

**१)** सदर ऑनलाईन माहितीपुस्तिका विनामूल्य आहे. उमेदवाराने अर्ज डाऊनलोड करून वाचावा व नंतर ऑनलाईन पद्धतीने भरावा. प्रवेशासाठी Online अर्ज भरण्यापूर्वी या माहितीपुस्तिकेतील भाग—१ ते भाग-३ माहिती वाचावी.

**२)** ऑनलाईन अर्ज भरताना आपण भरलेली माहिती बरोबर आहे याची खात्री करूनच 'Submit' बटण दाबावे.

**३)** ऑनलाईन अर्जात भरलेल्या संपूर्ण माहितीचे मूळ पुरावे पडताळणीवेळी आपणाकडे असणे अनिवार्य असेल.

**४)** ऑनलाईन अर्जात माहिती भरल्यानंतर नेटबँकिंगद्वारे / खुल्या प्रवर्गासाठी रु. ४००/- आणि राखीव प्रवर्गासाठी रु. २००/- याप्रमाणे प्रोसेसिंग शुल्क भरावे.

**५)** प्रवेशासाठी तुम्हाला दोन अर्ज भरावे लागतील, ते म्हणजे

(अ) ऑनलाईन प्रवेश अर्ज

(आ) छापील नमुना अर्ज (माहितीपुस्तिकेत शेवटी दिलेला) — माहिती पडताळणीच्या वेळी ऑनलाईन प्रवेश अर्ज प्रिंट व या पुस्तिकेत शेवटी दिलेला प्रवेशासाठीचा छापील अर्ज पूर्णत: भरून प्रवेश अर्ज पडताळणीच्या वेळी सादर करणे अपेक्षित असेल.

**६)** प्रत्येक ऑनलाईन प्रवेश अर्जाचे पडताळणी संबंधित विभागीय केंद्रावर करण्यात येईल. पडताळणी झालेलेच प्रवेश अर्ज गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचाराधीन असतील.

**७)** विभागीय केंद्रावर पडताळणी झाल्यानंतर फॉर्म लॉक करण्यात येईल. त्यानंतर कोणताही बदल करता येणार नाही. त्यामुळे पडताळणीनंतर त्याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार विद्यापीठाला करू नये.

**८)** एन.सी.टी.ई. नियमानुसार डी.एड. पूर्ण केलेले व प्राथमिक शिक्षक म्हणून किमान दोन वर्षांपासून सेवेत असणारेच शिक्षक प्रवेशास पात्र असतील.

**९)** मुंबई विभागातील उमेदवारांनीही आपल्या शाळेच्या जिल्ह्यातूनच प्रवेश अर्ज भरावा अन्यथा प्रवेशप्रक्रियेतून तो बाद होईल.

**मुंबईतील अभ्यासकेंद्रांच्या विभागाची माहिती सोयीसाठी खाली दिलेली आहे.**

- मुंबई उपनगर (सबअर्बन) साठी - चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चेंबूर (3102A) हे अभ्यासकेंद्र असेल. यात बोरिवली (URC-1), कांदिवली (URC-2), गोरेगाव (URC-3), अंधेरी (URC-4), सांताक्रूझ (URC-5), भांडूप (URC-6),घाटकोपर (URC-7), चेंबूर (URC-8), कुर्ला (URC-9), घाटकोपर (DYD_URC-3), अंधेरी (DYD_URC-5), मालाड W (DYD_URC-6),
  कांदिवली E (DYD_URC-7), हे विभाग असतील.
- मुंबई शहरासाठी - एस.टी. शिक्षणशास्त्र महाविद्यालय धोबीतलाव (31139) हे अभ्यासकेंद्र असेल. यात परेल (URC-10), दादर (URC-11), भायखळा (URC-12), ग्रँटरोड (DYD_URC1), सायन (DYD_URC2), मुलूड (DYD_URC4) हे विभाग असतील.
- ठाणे व पालघर जिल्ह्यासाठी — सेवासदन कॉलेज ऑफ एज्युकेशन, उल्हासनगर जि.ठाणे (3501A) हे अभ्यासकेंद्र असेल.
- रायगड जिल्ह्यासाठी — शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल जि.रायगड (3213A) हे अभ्यासकेंद्र असेल.

**१०)** महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याला स्वतंत्र अभ्यासकेंद्र आहे. प्रवेशार्थीने आपल्या शाळेच्या जिल्ह्याचाच अभ्यासकेंद्र म्हणून विचार करणे अनिवार्य आहे.

११) एखाद्या अभ्यासकेंद्राच्या जागा प्रवेशअर्जाअभावी रिक्त राहिल्यास संबंधित विभागातील इतर जिल्ह्यांना त्या रिक्त जागा समान संख्येने वाटून दिल्या जातील व तेथे त्या अतिरिक्त जागा म्हणून भरण्यात येतील. हे करताना त्या जिल्ह्यातील जागा ५० पेक्षा जास्त होणार नाहीत.
१२) प्रवेशासंदर्भातील सर्व सूचना 'http://ycmou.digitaluniversity.ac' या वेबसाईटवर प्रकाशित करण्यात येतील. प्रवेशार्थीने त्या पाहून त्यानुसार कृती करणे प्रवेशार्थीची जबाबदारी असेल.
१३) प्रवेशांनंतर बी.एड. शिक्षणक्रम संरचना, अभ्यासविषयक साहित्य किंवा अभ्यासकेंद्रात काही कारणास्तव बदल करण्यात आला तर तो पाळणे प्रवेशार्थीला बंधनकारक असेल.

**महत्त्वाचे** -महत्त्वाचे म्हणजे या शिक्षणक्रमाला दिला जाणारा प्रवेश केवळ गुणवत्तेनुसार व नियमानुसार दिला जातो. अन्य कोणताही मार्ग कोणी सूचित केल्यास मा. कुलसचिव यांच्याकडे लेखी तक्रार करावी.

# भाग –II बी.एड. प्रवेशासंदर्भात माहिती

**मुक्त विद्यापीठाविषयी थोडेसे** - महाराष्ट्र शासनाने मुक्त विद्यापीठाची स्थापना 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कायदा १९८९' अन्वये १ जुलै १९८९ रोजी केली. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य असून, विद्यापीठाचे मुख्यालय नाशिक येथे आहे. शिक्षण अर्धवट राहिलेल्या अनेक व्यक्तींना स्वतःची नोकरी, व्यवसाय वा उद्योग सांभाळून स्वयं-अध्ययनाद्वारे पुढे शिक्षण घेता यावे, या हेतूने मुक्त विद्यापीठाची स्थापना झाली. मुक्त विद्यापीठाचे ध्येय लोक विद्यापीठ बनणे हे आहे. मुक्त विद्यापीठाच्या कार्याची दखल घेऊन २००२ या वर्षी **Commonwealth of Learning, Canada** या संस्थेने 'Award of Excellence for Institutional Achievement' हा पुरस्कार या विद्यापीठाला दिला. भारतातील हे पाचवे व देशातील विविध राज्यांत सुरू झालेल्या राज्य स्तरावरील मुक्त विद्यापीठांपैकी हे चौथे विद्यापीठ आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची शिक्षणपद्धती दुरशिक्षणाची (Distance Education) आहे. विद्यापीठाने राज्यभर विखुरलेल्या अभ्यासकेंद्रांमार्फत विद्यार्थांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

## १. विद्याशाखा परिचय

विद्यापीठात एकूण आठ विद्याशाखा आहेत. शिक्षणशास्त्र विद्याशाखा त्यातील एक आहे. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर अवघ्या एका वर्षाच्या कालावधीत म्हणजे १९९० मध्ये या विद्याशाखेने नावारूपाला येण्याच्या दृष्टीने पावले उचलली. १९९१ मध्ये सेवांतर्गत शिक्षकांसाठी बी.एड., १९९४ मध्ये सहयोगी बी.एड. तर १९९९ पासून बालसंगोपन आणि रंजन शिक्षणक्रम प्रमाणपत्र, स्वयं-सहाय्यता प्रेरक-प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रम, मूल्यशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम, शिक्षकांसाठी माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान, घरकामगार कौशल्य प्रमाणपत्र शिक्षणक्रम, शालेय व्यवस्थापन पदविका, PGDEEDs, बी.एड. (विशेष) एम.ए. शिक्षणशास्त्र आणि पीएच.डी. शिक्षणशास्त्र हे शिक्षणक्रम सुरू केले. ज्याआधारे विद्यापीठाला तळागाळातील लोकांपर्यंत बहुसंख्येने पोहोचणे शक्य झाले. त्या दृष्टीने विद्याशाखेने स्वतःची उद्दिष्टे, व्रतविधानही तयार केले आहे. या विद्याशाखेतील सर्वांत महत्त्वाचा मानला जाणारा हा सेवांतर्गत शिक्षक-प्रशिक्षण (बी.एड.) शिक्षणक्रम आहे. या विद्याशाखेची बी.एड. आणि एम.एड. शिक्षणक्रमाची विद्यार्थिनी श्रीमती स्वाती वानखेडे यांना Commonwealth of Learning, Canada या संस्थेने 'Award of Excellence for Distance Learning Experience' हा पुरस्कार २००४ साली दिला आहे.

## २. शिक्षणक्रमासंबंधी माहिती

देशभरातील पारंपरिक विद्यापीठांमधून दोन वर्षे कालावधीचा नियमित बी.एड. शिक्षणक्रम सुरू आहे. नियमित बी.एड. शिक्षणक्रम सेवांतर्गत शिक्षकांना करता येणे शक्य नाही. त्यामुळे मुक्त विद्यापीठाने सेवांतर्गत शिक्षकांसाठी नोकरी करताना पूर्ण करता येईल असा २ वर्षे कालावधीचा 'शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रम' (बी.एड.) १९९१ पासून सुरू केला.

**(२.१) कालावधी** - या शिक्षणक्रमाचा किमान कालावधी २ वर्षांचा व कमाल कालावधी ५ वर्षांचा आहे. कमाल पाच वर्षांच्या कालावधीत शिक्षणक्रम पूर्ण न केल्यास विद्यार्थ्यास कमाल कालावधी संपल्याच्या दिवसापासून, पुन्हा पाच वर्षांसाठी त्या वर्षाच्या तुकडीचे संपूर्ण शुल्क भरून पुनर्नोंदणी करता येईल.

**(२.२) एकूण श्रेयांक** - हा शिक्षणक्रम ५४ श्रेयांकांचा म्हणजे सुमारे १७५५ अध्ययन तासांचा आहे. (एक श्रेयांक म्हणजे ३० ते ३५ तासांचा अभ्यास होय.)

**(२.३) शिक्षणक्रम माध्यम** - बी.एड.शिक्षणक्रमाची भाषा मराठी असल्यामुळे या शिक्षणक्रमाचे सर्व स्वयं-अध्ययन साहित्य मराठीतच आहे .अभ्यासकेंद्रावरील सर्व कार्यदेखील मराठीतच होते. अपवाद म्हणून अमराठी विद्यार्थ्यांना त्यांच्या विनंती अर्जानुसार अंतर्गत कार्य व अंतिम लेखी परीक्षा उत्तर लेखनासाठी हिंदी / इंग्रजी माध्यमाची परवानगी देण्यात येते, मात्र अध्ययन साहित्य व अभ्यासकेंद्र कार्यासाठी तसा आग्रह मान्य केला जात नाही.

## ३. हा शिक्षणक्रम कोणासाठी?

प्राथमिक सेवांतर्गत शिक्षक ज्यांनी डी.एड. पूर्ण केले आहे, असे शिक्षक या शिक्षणक्रमास पात्र असतील.

## ४. एन.सी.टी.ई. प्रवेश नियम

N.C.T.E. ने प्रसिद्ध केलेल्या भारताच्या राजपत्रातील परिशिष्ट क्र. १० मुद्दा क्र. ४.२ मध्ये पुढील नियमांनुसार बी.एड. प्रवेशप्रक्रिया कार्यान्वित केली जाते.

**"Eligibility**

The following categories are eligible to be students of B.Ed. (ODL):

i. Trained in-services teachers in elementary education.

ii. Candidates who have completed a NCTE recognized teachers education programme through face-to-face mode. (कोर्ट आदेशान्वये D.Ed./D.T.Ed. face to face अट शिथिल करण्यात आली आहे.)

iii. The reservation and relaxation in marks for SC/ST/OBC/PWD and other categories shall be as per the rules of the Central Government, whichever is applicable."

## ५. जिल्हानिहाय जागा

एन.सी.टी.ई.ने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील बी.एड. शिक्षणक्रमाला एकूण १५०० जागांना मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याला ४२ जागा भरण्यात येतात. उर्वरित ३० जागा प्रत्येक जिल्ह्याला एक याप्रमाणे सैन्यदलातील सेवेत असलेले आजी व माजी कर्मचारी यांच्यासंदर्भात असलेल्या परिपत्रकानुसार भरण्यात येतील.

## ६. अतिरिक्त जागा

**(६.१) गोवा, बेळगाव व बिदर :** गोवा, बेळगाव, बिदर या महाराष्ट्राच्या सीमारेषेनजीकच्या मराठी भाषिक शिक्षकांसाठी **प्रत्येक ५०० विद्यार्थ्यांमागे एक जागा देण्यात येईल.** सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांचा एक संच तयार ठेवावा. प्रवेश मुलाखतीच्या वेळी त्याचा पडताळा घेण्यात येईल. नियुक्ती आदेश व अनुभवाचे दाखले हे मराठी / हिंदी / इंग्रजीतच असावेत. इंग्रजी वा मराठीत नियुक्ती आदेश व दाखले नसतील तर त्याची मराठीत अधिकृत भाषांतर प्रत आणावी. त्यावर मुख्याध्यापकाची सही व शिक्का असणे अनिवार्य आहे.

**(६.२) प्रयोगशील शाळा :** युनिसेफनी निवड केलेल्या प्रयोगशील शाळांतील अप्रशिक्षित शिक्षकांसाठी ५०० विद्यार्थ्यांमागे एक जागा राखीव ठेवण्यात येईल. या शिक्षकांनी आपले प्रवेश-अर्ज व संगणकीय अर्जाची प्रत भरून बंद पाकिटात त्यावर 'प्रयोगशील शाळेसाठीचा अर्ज' असे नोंदवून तो आपल्या शाळेमार्फत विद्यापीठाच्या नोंदणी कक्ष, विद्यार्थी सेवा विभाग, य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्याकडेच पाठवावयाचा आहे, याची नोंद घ्यावी. प्रवेशासाठी त्यांना मुख्याध्यापक / संस्थाप्रमुखांचे स्वतंत्र हमीपत्र भरून सादर करावे लागेल. उमेदवारांकडून शाळेमार्फत स्वतंत्रपणे अर्ज न आल्यास त्या अर्जाचा विचार होणार नाही.

## ७. आरक्षण तक्ता

शासन नियमानुसार व विद्यापीठ ठरावानुसार खालीलप्रमाणे अतिरिक्त व राखीव जागा राहतील.

**७.१** महाराष्ट्र शासनाच्या निर्णय क्रमांक एसटीसी १०९९/बी.एड. प्रवेश /(१४/९९) मशि-३ दि.१९ जानेवारी ९९ अन्वये अनुक्रमे अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय यांच्यासाठी ५०% जागा राखून ठेवलेल्या आहेत. या जागा शासनाच्या उपर्युक्त निर्णयानुसार भरण्यात येतील. एकूण निर्धारित जागांमध्ये आरक्षण पुढीलप्रमाणे राहील.

### आरक्षित जागा दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | प्रवर्ग | प्रमाण / टक्के |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती व अनुसूचित जातीमधील बौद्ध धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती (SC) | १३% |
| २. | अनुसूचित जमाती (ST) | ७% |
| ३. | विमुक्त जाती (मूळ १४ व तत्सम जाती) 'अ' (VJ-A) | 3% |
| ४. | भटक्या जमाती (जाने. १९९७ पूर्वीच्या २८ व तत्सम जाती, (NT-B) | २.५% |
| ५. | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) 'क' (NT-C) | ३.५% |
| ६. | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) 'ड' (NT-D) | २% |
| ७. | इतर मागासवर्गीयांकरिता (ओ.बी.सी.) (OBC) | १९% |
| **एकूण** | | **५०%** |

बी.एड. प्रवेशासाठी जिल्हानिहाय गुणवत्ता याद्या असल्याने आरक्षणाचाही जिल्ह्यानिहाय विचार होतो.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासननिर्णय क्र.टीईएम/३३९७/१२९२६/(९०८६) /तांशी-१/दि.११ जुलै ९७ च्या शासन निर्णयानुसार आरक्षित जागा एकूण ५० % करण्यात आल्या आहेत.

**(७.२) विशेष मागास प्रवर्गाबाबत (SBC) :-** गुणवत्ता यादीनुसार प्रवेशप्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या **जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण** प्रवेश क्षमतेच्या जास्तीतजास्त २ टक्क्यांपर्यंत विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल.

आरक्षणच्या जागांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने बी.एड. प्रवेश मुलाखतीच्या वेळी शासन नियमानुसार जातीचे मूळ प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र तसेच ना सायस्तर प्रमाणपत्र (Non cremelayer) अनिवार्य असेल. सदरचे प्रमाणपत्रे प्रवेश अर्ज पडताळणीच्या वेळी वैध असावे.

तसेच शासन निर्णय क्र. एसटीसी-१००१/बी.एड.प्रवेश/(२४/२००१) माशि – ३ दि. ३० जानेवारी २००१ मधील तरतूद क्र. ३.५ अन्वये विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना संबंधित सक्षम अधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र योग्य त्या पद्धतीचा अवलंब करून देण्याबाबतचा उल्लेखानुसार कार्यवाही होईल.

**(७.३) शासन निर्णयानुसार एकूण प्रवेश क्षमतेच्या ३० % जागा महिला उमेदवारांकरिता राखीव राहतील.**

**टीप** : आरक्षणाच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांनुसार कार्यवाही करण्यात येईल.

**(७.४) दिव्यांग व्यक्तींच्या प्रवेशासंदर्भात :-** दिव्यांग व्यक्तीच्या शिक्षणासाठी शासनाने ३ % आरक्षण ठेवलेले आहे. त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील प्रवेशेच्छुंची जनरल गुणवत्ता यादी तयार करण्यात येते. गुणवत्तेनुसार गुणवत्ता यादीत येणा-या दिव्यांगांना वगळून, दिव्यांगाच्या गुणवत्ता यादीत १ % अल्पदृष्टी, १ % कर्णबधिर, १ % अस्थिव्यंगाचा समावेश असेल. जिल्हानिहाय गुणवत्ता यादी असल्याने प्रत्येक जिल्ह्यास किमान एक आणि कमाल दोन जागा दिल्या जातील. अशा एकूण ४५ जागा संपूर्ण महाराष्ट्रात दिव्यांगांसाठी शासन नियमानुसार राखीव असतील. (दिव्यांगांबाबतची सविस्तर योजना माहितीपुस्तिकेतील परिशिष्टामध्ये दिलेली आहे, ती पाहावी. दिव्यांगांचे आरक्षण अंतर्गत असल्यामुळे प्रथम गुणवत्तेनुसार या जागा भरल्या जातील व भरलेल्या जागा ज्या संवर्गाच्या असतील तेवढ्या जागा नियमित प्रवेशाच्या जागांमधून कमी होतील.

**(७.५) सैनिक :** सैन्यदलातील आजी व माजी कर्मचारी / पत्नी किंवा त्यांचा मुलगा / अविवाहित मुलगी यांना २ % जागा राखून ठेवल्या जातील.

**(७.६)** स्वातंत्र्यसैनिक पती / पत्नी, मुलगा / अविवाहित मुलगी तसेच भूकंप व प्रकल्पग्रस्त आणि विधवा व परितक्ता या संवर्गासाठी अतिरिक्त २ गुण देण्यात येतील.

## ८. शिक्षणक्रम प्रवेश पात्रता

### किमान पात्रता

**(८.१)** यू .जी.सी. मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी / पदव्युत्तर पदवी.

**(८.२)** पदवी / पदव्युत्तर पदवी परीक्षेत खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना किमान ५० % (**४९.५ ते ५० टक्क्यांपर्यंतचे गुण**) व मागासवर्गीय उमेदवारांना किमान ४५ % (**४४.५ ते ४५ टक्क्यांपर्यंतचे गुण** ) गुण असणे अनिवार्य आहे. (महाराष्ट्र शासनाने ज्या प्राथमिक शिक्षकांना पदवीधर स्केल देऊन पाच/सात वर्षात बी.एड.पूर्ण करण्याची अट घातलेली आहे. अशा प्रवेशेच्छुंना पदवी / पदव्युत्तर परिक्षा उतीर्णतेच्या गुणांची अट नाही, मात्र उतीर्ण असणे आवश्यक आहे.)

**(८.३)** डी.एड. शिक्षणक्रम पूर्ण केलेले आणि मान्यताप्राप्त प्राथमिक स्तरावर शासनाने मंजूर केलेल्या पदावर पूर्णवेळ / अर्धवेळ काम करणाऱ्या व किमान दोन वर्षांचा (अर्धवेळ असल्यास ४ वर्षे) अनुभव असलेल्या अध्यापकांना सेवाज्येष्ठतेनुसार प्रवेश मिळेल.

**(८.४)** प्रवेशासाठी किमान दोन वर्षांचा अनुभव अनिवार्य असेल. पूर्णवेळ / अर्धवेळ सेवेत असल्याचे व शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत सेवेत ठेवले जाईल, असे शाळाप्रमुखांचे प्रमाणपत्र देऊ शकणाऱ्या पदवीधर शिक्षकांना या शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

## ९. प्रवेश अपात्रता

पुढील प्रकारच्या अर्जांचा प्रवेशासाठी विचार केला जात नाही आणि अशी आवेदनपत्रे प्राप्त झाल्यास ती रद्द करण्यात येतील व उमेद्‌वारास याबाबत कळविले जाणार नाही.

९.१) ज्यांच्या सेवा आदेशात शिक्षक नियुक्ती असा उल्लेख नाही.

९.२) चुकीच्या जिल्ह्यातून प्रवेश अर्ज भरणारे

९.३) चुकीची माहितीचे प्रवेश अर्ज

९.४) सेवेत नसलेले अध्यापक.

९.५) तासिका वेतनावर कार्यरत शिक्षक.

९.६) यू.जी.सी. मान्यता नसलेल्या विद्यापीठाचे पदवीधारक.

९.७) माध्यमिक/उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक/प्रयोगशाळा सहायक/कनिष्ठ सहायक / लिपिक, ग्रंथपाल, इत्यादी.

९.८) पदवी वर्षाच्या अंतिम परीक्षेस बसलेले, परंतु निकाल न लागल्यामुळे पदवी परीक्षेचे पदवी प्रमाणपत्र किंवा गुणपत्रिकेची सत्यप्रत न जोडणारे शिक्षक.

९.९ ) बालवाडीत शिकविणारे अध्यापक.

९.१०) तांत्रिक विद्यालये, कृषी विद्यालये व तत्सम अन्य विद्यालये, एम.सी.व्ही.सी. निदेशक (Instructor) हे प्रवेशासाठी पात्र नाहीत.

९.११) प्रवेश-अर्जावर मुख्याध्यापकाची सही नसणारे तसेच सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र न जोडणारे शिक्षक प्रवेशास अपात्र ठरतील.मात्र मुख्याध्यापकच स्वतः उमेदवार असेल, तर संस्थेचे सचिव वा शिक्षणाधिकारी यांची सही व शिक्का असणे आवश्यक आहे.

९.१२) मराठीचे पुरेसे ज्ञान नसलेले विद्यार्थी अपात्र ठरतील.

९.१३) राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र / जात पडताळणी प्रमाणपत्र / सायस्तर नसल्याचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी मुदतीत सादर करू न शकणारे उमेदवार प्रवेशास अपात्र ठरतील.

## १०) प्रवेश-अर्ज कसा भरावा?

आपणाला बी.एड. प्रवेश-अर्ज ऑनलाईन भरायचा आहे. त्यामुळे माहिती पुस्तिका बारकाईने वाचून मगच ऑनलाईन प्रवेश-अर्ज भरावा. प्रवेश-अर्ज भरतेवेळी आपण राखीव प्रवर्गातील असाल तर ना सायस्तर, जात पडताळणी प्रमाणपत्र आपणाजवळ असणे आवश्यक आहे. नेट बँकिंगद्वारे प्रोसेसिंग शुल्क भरल्यानंतर आपल्याला आपला प्रवेश-अर्ज यशस्वीपणे भरला गेल्याचा संदेश येईल. ज्या विद्यार्थ्यांना अर्ज यशस्वीपणे भरल्याचा संदेश येईल तेवढेच अर्ज प्रवेशासाठी विचाराधीन असतील, याची नोंद घ्यावी. प्रवेश पात्रतेच्या माहितीत आपण काही चूक केल्यास आपण प्रवेशेच्छुंच्या यादीत नसाल. तसेच प्रवेश-अर्ज भरतेवेळी गुणवत्ता यादीवर परिणाम करणा-या घटकांबाबत आपण केलेली चूक, अपूर्ण माहिती व पुरविलेली खोटी माहिती आपणास प्रवेशप्रक्रियेतून बाद करू शकते याचीही नोंद घ्यावी. प्रवेश-अर्ज ऑनलाईन भरण्याची जबाबदारी व भरलेला अर्ज बरोबर आहे का? ते तपासण्याची जबाबदारी पूर्णतः प्रवेशेच्छूकांची आहे. याची नोंद घ्यावी .

**(१०.१)** बी.एड. प्रवेशासाठी दोन अर्ज भरावे लागतात. त्यातील पहिला अर्ज आपणाला ऑनलाईन भरावा लागतो व दुसरा अर्ज प्रवेशाच्या वेळी भरावा लागेल. त्याचा नमुना माहितीपुस्तिकेत शेवटी दिलेला आहे . ऑनलाईन भरलेल्या संगणकीय अर्जाच्या आधारेच गुणवत्ता यादी तयार केली जाते. त्यामुळे ऑनलाईन अर्ज बिनचूक भरणे आवश्यक आहे.

**(१०.२)** ऑनलाईन संगणक अर्ज कोठेही जमा करू नये, मूळ कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सोबत आणावीत.

**(१०.३)** संगणक अर्जात लिहिलेला अनुभव, पदवी / पदव्युत्तर पदवीचे गुण व श्रेणी आणि प्रवर्गाच्या आरक्षणाआधारेच प्रथमदर्शनी प्रवेशाची यादी निश्चित होते. या निश्चितीपूर्वी प्रवेशेच्छुंना पुन्हा एकदा आपल्या भरलेल्या प्रवेश- अर्जातील त्रुटी दुर करण्याची संधी प्रवेश अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर देण्यात येईल. त्यानंतर कोणत्याही स्वरूपाची तक्रार (ऑब्जेक्शन) विचारात घेतले जाणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी. प्रवेशानंतर प्रवेशार्थीने दिलेली माहिती वा कागदपत्रे खोटी असल्याचे सिद्ध झाल्यास, सदर विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल व शुल्कही परत केले जाणार नाही. तसेच त्यावर फौजदारी गुन्हाही दाखल करण्यात येईल याची नोंद घ्यावी .

**(१०.४)** शिक्षक म्हणून अनुभव लिहिताना संगणक अर्जावर **(पुरावे सादर करू शकत असलेल्या)** केवळ तुमच्या एकूण सेवा कालावधीची नोंद करावी. ई-माहितीपुस्तिकेतील प्रवेश-अर्जावर अनुभव नोंदवताना नोकरीच्या सुरुवातीपासूनचे सर्व कार्यालयीन आदेश किंवा पुराव्याप्रमाणे नोंद करावी. **अनुभवाचा पुरावा म्हणून सेवेचे प्रमाणपत्र हे दस्तऐवज मान्य करण्यात येत नाही याची कृपया नोंद घ्यावी.** ज्या सेवेचे पुरावे उदा. सेवा पुस्तिकेतील नोंद, सेवा ऑर्डर इ. तुमच्याकडे नाहीत त्याची नोंद प्रवेश-अर्जात किंवा संगणकीय अर्जात करू नये.

**(१०.५)** पूर्वीची सेवा अर्धवेळ असल्यास प्रवेश-अर्जात अनुभव नोंदविताना तसा स्पष्ट उल्लेख करावा. यासंदर्भात ‘शिक्षणक्रम प्रवेश-पात्रता’ मुद्दा क्र.८.३ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**(१०.६)** तुम्ही ज्या शाळेत सेवेत असाल त्या शाळेचा जिल्हा, संगणक प्रवेश अर्जावरील ‘जिल्हा’ या ठिकाणी नोंदवावा. तुमची शाळा ज्या जिल्ह्यात असेल त्याच जिल्ह्यात तुम्हाला प्रवेश घ्यावा लागेल. बी.एड.चे प्रवेश हे जिल्हा गुणवत्ता यादीनुसार देण्यात येतात.

**(१०.७)** भरलेल्या ऑनलाईन अर्जातील माहितीचे पुरावे पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य असेल.

**(१०.८)** अर्जदाराची कागदपत्र सत्यता तपासणीसाठीच्या यादीत प्रवेशासाठी निवड झाल्यास अर्जातील सर्व माहितीचा पुरावा देणारी तसेच सेवा सत्यता पडताळणीसाठीची प्रमाणित कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सोबत आणावी.

क) मूळ प्रवेश अर्ज व ऑनलाईन संगणकीय अर्जाची प्रत.

ख) शैक्षणिक पात्रतेचे गुणपत्रक व प्रमाणपत्रांच्या मूळ व प्रमाणित सत्यप्रती.

ग) प्रवेश-अर्जात नोंद केल्याप्रमाणे प्रत्येक विद्यालयातील सुरुवातीपासून पुढील सर्व नेमणुकीच्या आदेशांच्या मूळ व प्रमाणित सत्यप्रती, अनुभवाचे मूळ प्रमाणपत्र.

घ) मागासवर्गीय असल्यास पुढे नमूद केल्याप्रमाणे मूळ प्रत व प्रमाणित सत्यप्रत.

**अनुसूचित जाती (एस.सी.)** — जातीचा दाखला
**अनुसूचित जमाती (एस.टी.)** — जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र
**विमुक्त जमाती / भटक्या जाती / इतर मागासवर्गीय / विशेष मागासवर्गीय (VJ/NT/OBC/SBC)**_जातीचा दाखला, ऑनलाईन संगणकीय अर्जात नमूद केलेल्या नावाचे अर्ज भरतांना वैध नॉन क्रीमिलेयर प्रमाणपत्र आवश्यक.

ङ) जन्मतारखेचा पुरावा दर्शविणारी कोणत्याही प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत.

च) सर्व सेवेचे नेमणूक आदेश, शिक्षणाधिकारी / शिक्षण उपसंचालक यांच्या शिक्षक किंवा पदमान्यता पत्राच्या सुरुवातीपासूनच्या सर्व साक्षांकित प्रती, शाळा मान्यतापत्र.

छ) मेंटार (वरिष्ठ शिक्षक) मान्यता प्रमाणपत्र.

ज) शाळा अनुदानित असेल तर वर्षनिहाय शाळा तपासणी अहवालाच्या साक्षांकित प्रती.

झ) सेवापुस्तिकेतील संबंधित नोंदी. (संपूर्ण सेवापुस्तिकेची साक्षांकित केलेली फोटोकॉपी)

ञ) नावात बदल असल्यास नाव बदल पुरावा म्हणून राजपत्र.

**ट) सामाजिक आरक्षणांतर्गत येणाऱ्या उमेदवारांना**

- **दिव्यांग** : किमान ४० % दिव्यांग असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रमाणपत्र.
- **प्रकल्पग्रस्त** : जिल्हा पुनर्वसन अधिकारी / सक्षम अधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र, परंतु त्या प्रमाणपत्रात उमेदवाराचे नाव असणे आवश्यक.
- **आपत्तीग्रस्त** : उपविभागीय अधिकारी /तहसीलदार यांचे प्रमाणपत्र, परंतु त्या प्रमाणपत्रात उमेदवाराचे नाव असणे आवश्यक.
- **स्वातंत्र्यसैनिक पाल्य** : पत्नी / मुलगा / अविवाहित मुलगी यांनी स्वातंत्र्यसैनिकाच्या ओळखपत्राची प्रत व पाल्याच्या नातेसंबंधाचा पुरावा.

- **आजी / माजी सैनिक पाल्य :** सैनिकाची पत्नी / मुलगा / अविवाहित मुलगी यांना जिल्हा सैनिक बोर्डाचे प्रमाणपत्र आवश्यक. नातेसंबंधाचा पुरावा आवश्यक, डिस्चार्ज पुस्तक आवश्यक.
- **विधवा :** महानगरपालिका / नगरपालिका / ग्रामपंचायत यांच्याकडून प्राप्त झालेले पतीचे मृत्यू प्रमाणपत्र.
- **घटस्फोटिता :** विवाहनोंदणी दाखला किंवा न्यायालयाचे घटस्फोटाबाबतचे आदेश किंवा मुस्लीम महिलांच्या बाबतीत नियमाप्रमाणे निकाह लावणारे काझी / इमामांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र. ते प्रमाणपत्र नोटरी करून मराठी भाषेत भाषांतर करून आणणे आवश्यक.
- **गोवा - बेळगाव बिदर :** हा मराठी भाषिक प्रदेश असल्याने या उमेदवारांनी नियुक्ती आदेश व अनुभवाचे दाखले हे मराठी / हिंदी / इंग्रजीत आणावे व त्यावर संबंधित अधिकारी / मुख्याध्यापकाची सही व शिक्का आणणे अनिवार्य असेल. मुलाखतीच्या वेळी वरील मूळ व साक्षांकित (Attested) प्रमाणपत्रांआधारे आपल्या प्रवेश-अर्जातील माहितीची सत्यता पडताळून पाहण्यात येईल. त्यामुळे उपरोक्त आवश्यक ती कागदपत्रे तुमच्या जवळ नसल्यास प्रवेश दिला जाणार नाही.

**(१०.०९)** संगणक अर्जातून प्राप्त माहितीच्या आधारे पडताळणी यादी तयार करण्यात येईल. गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीकरिता विभागीय केंद्रावर नियोजित वेळेत सादर करणे अनिवार्य असेल.

**(१०.१०)** कागदपत्रे पडताळणी झालेल्या अर्जांचाच प्रवेशासाठीच्या प्रवेश निवड यादीत (Selection List) विचार करण्यात येईल. पडताळणीमध्ये विभागीय केंद्र समिती उमेदवाराचा अर्ज तपासतील व कागदपत्रांची तपासणी गुण प्रमाणित करण्यात येतील. त्यानुसार केंद्रनिहाय ४२/४३ प्रवेशेच्छुंची यादी (खुला व राखीव प्रवर्ग) प्रवेशासाठी जाहीर करण्यात येईल.

संबंधित उमेदवारांनी प्रवेशाशी संबंधित डी.यू.पोर्टलवरील अर्ज भरणे, शुल्क भरणे व आपला प्रवेश अंतिम करणे यासाठी विभागीय केंद्रावर/ विद्यापीठात पुन्हा येणे अपेक्षित असेल. त्यासंदर्भात विद्यापीठ संकेतस्थळावर गुणवत्तायादी सोबत सूचना देण्यात येईल. त्यासाठी विशिष्ट मुदतीतील विभागीय केंद्रातील जिल्हानिहाय प्रवेशयाद्या प्रवेश वेळापत्रकासह प्रसिद्ध करण्यात येतील. प्रवेश न घेणाऱ्या उमेदवाराच्या जागी त्याच प्रवर्गातील गुणवत्ता यादीतील पुढील उमेदवार भरण्यात येईल. पडताळणी यादी, निवड यादी, पडताळणीपत्र, प्रवेशपत्र केवळ वेबसाईटवरच टाकण्यात येईल.

**लक्षात ठेवा -** विभागीय केंद्रावर प्रवेश अर्ज पडताळणीसाठी जाताना मुद्दा क्र. १०.८ मध्ये नमूद केलेली तसेच प्रवेश- अर्जात भरलेल्या माहितीचा पुरावा देणारी सर्व मूळ कागदपत्रे उमेदवाराने आणणे बंधनकारक आहे. उमेदवाराजवळ उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारेच त्याच्या अर्जाचे पडताळणी करण्यात येईल. राखीव गटातून अर्ज करणाऱ्या उमेदवाराकडे शासनाने निर्धारित केलेली वैध कागदपत्रे असणे बंधनकारक असेल.

**(१०.११)** निवड यादी प्रसिद्ध झाल्यानंतर त्यात नाव असणाऱ्या उमेदवाराने नियोजित वेळी विभागीय केंद्रावर / विद्यापीठात प्रवेशासाठी येण्यापूर्वी डी.यू. पोर्टलवरील प्रवेशार्थी माहितीचा (Othentification) फॉर्म भरणे अनिवार्य असेल. प्रवेशानंतर शिक्षणक्रम शुल्क भरणे अपेक्षित असेल.

**(१०.१२)** प्रत्येक अभ्यासकेंद्रावर निर्धारित जागा आहेत. त्या भरल्या न गेल्यास त्या केंद्राच्या प्रतीक्षा यादीतील पुढील उमेदवारांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतील. प्रवेश-अर्जाअभावी एखाद्या जिल्ह्याची जागा रिक्त राहिल्यास त्या जागा त्या विभागातील इतर जिल्ह्यांत समान वाटप करून रिक्त जागांच्या प्रवर्गानुसार भरण्यात येतील.

**(१०.१३)** बी.एड. शिक्षणक्रमाच्या प्रवेशाबाबत कोणाची काही तक्रारी असल्यास त्या तक्रारी / तक्रार ऑब्जेक्शन नोंदविण्यासाठी दिलेल्या संधीच्या वेळीच सादर कराव्यात. विद्यापीठ त्यावर योग्य तो निर्णय घेईल. मात्र पडताळणी संपल्यानंतर आलेल्या तक्रार अर्जांवर विचार केला जाणार नाही.

**(१०.१४)** या शिक्षणक्रमासाठी कागदपत्रे तपासणी यादी आणि निवड यादीबाबत उमेदवारांना केवळ विद्यापीठ संकेतस्थळावरूनच कळवले जाईल. तसेच सदर याद्याही विद्यापीठ संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध करण्यात येतील. तसा मेसेज आपणाला प्रवेशासाठी भरलेल्या ऑनलाईन प्रवेश-अर्जात नोंदविलेल्या मोबाईलवर पाठविण्यात येईल. बी.एड. प्रवेशासाठी विद्यापीठ संकेतस्थळ पाहण्याची जबाबदारी उमेदवारांची असेल

**(१०.१५)** या पुस्तिकेतील प्रवेश-अर्ज व त्याची सहपत्रे उमेदवाराने ज्या अभ्यास तुकडीसाठी सादर केले असतील त्या तुकडीच्या प्रवेशासाठीच वैध असतील.

**(१०.१६)** संगणकीय अर्जात जिल्हा संकेतांकाची चुकीची नोंद केल्यास तुमचा प्रवेशासाठी विचार होणार नाही. यासाठी संगणकीय अर्जात आपली शाळा, शाळेचा तालुका व जिल्हा याची नोंद अचूक करावी. बी.एड. प्रवेशयाद्या जिल्हानिहाय असल्याने तुम्ही तुमच्या शाळेची निवड त्याचा तालुका वा जिल्हा चुकीचा नोंदविला तर तुमचे अभ्यासकेंद्रे बदलेल. वेगळ्या जिल्ह्यात तुम्हाला प्रवेश दिला जाणार नाही.

> **लक्षात ठेवा** – तुम्ही या शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी भरलेला ऑनलाईन अर्ज पडताळणी नंतरची प्रिंट, ई-चलन पावती व प्रवेश माहितीपुस्तिकेतील प्रवेश अर्ज स्वतःकडे ठेवणे आवश्यक आहे. प्रवेशाचे वेळी येताना ते सोबत आणावेत.

## (११) प्रवेश प्रवाही तक्ता

### प्रवेशासंदर्भातील फ्लो चार्ट

ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे
(ऑनलाईन भरलेल्या प्रवेश अर्जाची प्रथम प्रिंट घेणे सुविधा)
↓
प्रवेश अर्ज भरणे मुदत संपल्यावर प्रवेशार्थीना तीन दिवस माहिती संपादनासाठी (बदल केल्यास नवीन द्वितीय प्रिंट घेणे )प्रवेश अर्ज उपलब्ध
↓
कागदपत्र सत्यता तपासणीसाठीची यादी प्रसिद्ध (वेळापत्रकासह)
↓
दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे विभागीय केंद्रावर अर्ज तपासणी
↓
सर्व अर्ज तपासणीनंतर तात्पुरती गुणवत्ता यादी Provisional merit list प्रसिद्ध
↓
२ दिवस तक्रार नोंद करण्यासाठी अवधी
↓
अंतिम निवड यादी
↓
विभागीय केंद्रावर / विद्यापीठात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज प्रमाणिकरण अंतिम प्रवेश व शुल्क भरणे
↓
प्रवेश निश्चिती
↓
उर्वरित जागांसाठी द्वितीय गुणवत्ता यादी जाहीर
↓
↓ अभ्यासकेंद्रावर जाऊन शुल्क भरणे.
↓ प्रवेश पूर्ततेनंतर नोंदणी विभागाकडून कायम नोंदणी क्रमांक देणे.

## (१२) निवड-प्रक्रिया

**(१२.१)** सदर शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी गुणवत्ता यादी तयार करताना केवळ ऑनलाईन संगणकीय अर्जात भरलेल्या माहितीचा विचार केला जातो. उदाहरणार्थ : सेवाज्येष्ठता, पदवी, पदव्युत्तर पदवी आणि

अतिरिक्त पदवीचे गुण इत्यादी. आरक्षणासंदर्भात संगणक अर्जातील माहिती व शासन नियमांचे पालन करण्यात येते.

**(१२.२)** गुणवत्ता यादी करताना प्रथम अनुभवानुसार पायाभूत गुण देण्यात येतील. प्रत्येक वर्षासाठी एक गुण असे एकूण जितक्या वर्षांचा अनुभव असेल तितके गुण मिळतील. एका वर्षापेक्षा कमी कालावधीचे गुण ठरविताना जर अनुभव सहा महिने किंवा अधिक असेल तर एक गुण धरण्यात येईल. त्यापेक्षा कमी महिन्यांच्या सेवेला गुण देण्यात येणार नाहीत. अर्धवेळ काम करणाऱ्या शिक्षकांची सेवा मुद्दा क्र. ८.३ मध्ये दिल्याप्रमाणे विचारात घेतली जाईल. प्रवेशासाठी मराठीचे पुरेसे ज्ञान उमेदवाराकडे असणे अनिवार्य आहे, तसे नसल्याचे मुलाखत समितीचे मत झाल्यास त्याला प्रवेश नाकारण्यात येईल. त्यासंदर्भात कोणाचीही तक्रार ऐकली जाणार नाही.

## (१२.३) प्रवेशासंदर्भातील यादीत खालील मुद्दे विचारात घेतले जातात.

(पदवी, पदव्युत्तर पदवी, किंवा पदवीनंतरची अतिरिक्त एक वर्षाची पदविका किंवा पदवी प्राप्त केलेली असल्यास अध्ययनार्थींना मिळालेल्या श्रेणीनुसार खालीलप्रमाणे गुण ग्राह्य धरले जातात. मात्र प्रवेशार्थीने त्यासंदर्भातील माहिती ऑनलाईन अर्जात संबंधित रकान्यात भरणे आवश्यक आहे.)

| अ.क्र | पदवी उदा. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. | गुण | पदव्युत्तर पदवी (एकापेक्षा अधिक पदव्युत्तर पदव्या असतील तर एकाच पदवीचे गुण धरले जातील.) | गुण | पदवीनंतरची अतिरिक्त एक वर्षाची पदविका किंवा पदवी (उदा. बी.पी.एड., डिप्लोमा इन पाप्युलेशन एज्युकेशन, डिप्लोमा इन ॲडल्ट एज्युकेशन., डी.एस.एम.) | गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तृतीय किंवा सी श्रेणी | 0 गुण | तृतीय किंवा सी श्रेणी | ३ गुण | तृतीय किंवा सी श्रेणी | ३ गुण |
| २ | द्वितीय किंवा 'बी' श्रेणी | ४ गुण | द्वितीय किंवा 'बी' श्रेणी | ४ गुण | द्वितीय किंवा 'बी' श्रेणी | ४ गुण |
| ३ | प्रथम किंवा 'ए' श्रेणी | ५ गुण | प्रथम किंवा 'ए' श्रेणी किंवा 'ओ' श्रेणी | ५ गुण | प्रथम किंवा 'ए' श्रेणी किंवा 'ओ' श्रेणी | ५ गुण |
| ४ | विशेष गुणवत्ता किंवा 'ओ' श्रेणी | ६ गुण | ------------- | | | |

**वरीलप्रमाणे मुद्याअंतर्गतचे गुण प्राप्त होण्यासाठी प्रवेशेच्छू उमेदवाराने ऑनलाईन प्रवेश--अर्ज भरतेवेळी संबंधित शिक्षणक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.**

**सूचना :** जे विद्यार्थी पदव्युत्तर पदवीच्या द्वितीय श्रेणीमुळे प्रवेशास पात्र होतील त्यांना पदवीचे ओ श्रेणीनिहाय गुण देण्यात येणार नाहीत.

## (१२.४) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणक्रम पूर्ण केलेले असल्यास बी.एड. प्रवेशासाठी गुणवत्ता यादीमध्ये मिळणारे अतिरिक्त गुण

खालीलप्रमाणे प्राप्त होतील. मात्र ऑनलाईन प्रवेश-अर्जात त्यासंदर्भातील योग्य माहिती भरणे अनिवार्य आहे. एका पातळीवरील एकापेक्षा अधिक शिक्षणक्रम पूर्ण केलेले असले तरी, प्रत्येक स्तरावरील एकाच शिक्षणक्रमाचे गुण प्रवेशासाठीच्या गुणवत्ता यादीसाठी ग्राह्य धरण्यात येतील. मात्र online प्रवेश अर्ज भरतेवेळी संबंधित शिक्षणक्रमाचे उत्तीर्णतेचे गुणपत्रक प्रवेशार्थीकडे असणे आवश्यक आहे.

| यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे शिक्षणक्रम पूर्ण केलेले असल्यास अतिरिक्त बीएड प्रवेशासाठी मिळणारे गुण | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रमाणपत्र शिक्षणक्रम (किमान सहा महिने कालावधी असणे आवश्यक) | पदविका शिक्षणक्रम | पदवी शिक्षणक्रम | पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम | पदव्युत्तर पदवी संशोधन शिक्षणक्रम |
| **२ गुण** | **३ गुण** | **४ गुण** | **५ गुण** | **६ गुण** |

## (१२.५) प्रवेश-प्रक्रिया

प्रवेश यादी तयार करताना विभागीय केंद्रावर प्रवेश-अर्ज तपासणी केलेल्या अर्जांचाच विचार करण्यात येईल. कागदपत्रे तपासणीनंतर गुणवत्तेनुसार निवड यादी प्रसिद्ध होईल. त्यात प्रथमतः खुला प्रवर्ग व नंतर राखीव जागांचे प्रवेश होतील. एखाद्या मागासवर्गीय घटकासाठी पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या जागा पुढील फेरीत नियमानुसार व गुणवत्तेनुसार इतर मागासवर्गीयांच्या यादीतून संक्रमित पध्दतीने भरण्यात येतील. त्यासाठी शासन नियमानुसार पुढीलप्रमाणे जागांचे संक्रमण असेल.

गट ए – अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST)

गट बी – विमुक्त जाती (NT-A) व भटक्या जाती (NT-B)

गट सी – भटक्या जमाती (NT-C) व भटक्या जमाती (NT-D) आणि इतर मागासवर्गीय उमेदवारांचा समावेश असेल.

**संदर्भ** – शा.नि.क्र. टी.ई.एम.-२००६/(३०६/०६) तांशी- १, दि.६ जुलै २००६ (अध्यादेश २००६ ची अधिसूचना). दिव्यांग / आजी-माजी सैनिक / प्रयोगशील शाळा / गोवा, बेळगाव व बिदर त्या त्या संवर्गातील किमान गुणाअखेर आरक्षित जागांवर पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त जागा संवर्गानुसार मुक्त समजण्यात येतील व त्या संवर्गातील मूळ गटास दिल्या जातील.

त्यानंतरही राखीव प्रवर्गातून जागा शिल्लक राहिल्यास त्या सर्वसाधारण गटातून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील .

**(१२.६)** अंतिम गुणवत्ता यादीत जर समान गुण असतील तर प्रथम अनुभवाचा आणि नंतर वयानुसार ज्येष्ठता विचारात घेतली जाईल. जर वय समान असेल तर ज्यांनी पदवी अगोदर प्राप्त केली असेल त्यांना प्राधान्य मिळेल. त्यानंतरही समान गुण झाल्यास गुणवत्ताक्रम ठरविण्याचा अधिकार निवड समितीकडे राहील व तो अंतिम असेल.

**(१२.७)** पदवीधर वेतनश्रेणीबाबत – पदवीधर वेतनश्रेणी म्हणजे चटोपाध्याय श्रेणी (स्केल), वरिष्ठ निवड श्रेणी (स्केल), मुख्याध्यापक श्रेणी (स्केल) नसून, ज्या प्राथमिक शिक्षकांना शासनाने प्रत्यक्ष पदवीधर वेतनश्रेणी देऊन पाच /सात वर्षांच्या आत बी.एड. शिक्षणक्रम पूर्ण करण्याची अट लेखी स्वरूपात घातलेली आहे,अशा शिक्षकांना तसे पत्र दाखवल्यानंतर पदवीधर वेतनश्रेणी मिळाल्यापासून प्रत्येक वर्षासाठी एक अतिरिक्त गुण देण्यात येईल. त्यामुळे हे उमेदवार आपोआपच गुणवत्ता यादीत वरच्या भागात जाऊ

शकतील. वेतनश्रेणी मिळाली नसेल किंवा खोटी / चुकीची माहिती असेल तर देण्यात आलेले जादा गुण कागदपत्र व्हेरिफिकेशनच्या वेळी त्या प्रमाणात कमी होतील. त्याची पूर्ण जबाबदारी उमेदवाराचीच असेल. ५वी ते १०/१२ वी वर्ग असलेल्या माध्यमिक शाळेत डी.एड. स्केलवर कार्यरत अथवा माध्यमिक शिक्षक नियुक्ती असूनही पाचवी ते सातवी इयत्तांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना जर शासनाने प्राथमिक शिक्षकांची पदवीधर वेतनश्रेणी दिली असेल तर अशा व्यक्तींनी पदवीधर वेतनश्रेणी मिळाल्याची, तसेच ती श्रेणी मिळून किती वर्षे झालेली आहे त्याची नोंद संगणक अर्जावर करावी. पदवीधर वेतनश्रेणी प्राथमिक शिक्षकांना देण्यात येत असल्याने या योजनेचा लाभ घेणारे सर्व शिक्षक प्राथमिक स्तरात गणले जातील.

**पुन्हा एकदा महत्त्वाचे** - शहरी, ग्रामीण, आदिवासी विभाग, अतिदुर्गम भागात राहणाऱ्या सर्व प्रवेशेच्छुकांसाठी महत्त्वपूर्ण सूचना मुलाखतीसाठी निवड झालेल्या प्रवेशेच्छुकांना पोस्टाने कळविले जाणार नाही. त्यासाठी केवळ वेबसाईटचाच वापर करण्यात येईल. विद्यापीठाच्या वेबसाईटवरही प्रवेशासाठी निवड झालेल्यांची यादी पाहायला मिळेल. जवळच्या सायबर कॅफेतून ती प्राप्त करता येईल. तुम्ही ती न पाहिल्यास प्रवेश होणार नाही व त्यास तुम्हीच जबाबदार असाल. तसेच अशा उमेदवारांची नंतरच्या फेरीतही मुलाखतीसाठी निवड केली जाणार नाही.

**(१२.८) यादीमध्ये नाव आहे की नाही ते विद्यापीठाच्या वेबसाईटवर कसे पाहाल ?**

* विद्यापीठाच्या Homepage http://ycmou.digitalunivrsity.ac ला log on व्हा. प्रवेशास पात्र उमेदवारांच्या याद्यांसंबंधी सूचना त्यावर Click करा. त्यानंतर पुढे कसे जावे याबाबत सूचना आपल्याला बघायला मिळतील. त्या वाचून त्याप्रमाणे कृती करा म्हणजे आपण आपल्या नावापर्यंत पोहोचाल.

(१२.९) बी.एड. प्रवेशानंतर तुमच्या मोबाईलवर Password येईल. त्यावर तुमचे Profile तपासून पाहावे. विषय निवड,नावाच्या संदर्भात जर काही त्रुटी असतील तर तातडीने विभागीय केंद्रावर संपर्क साधावा.

(१२.१०) बी.एड. ला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला बी.एड.च्या द्वितीय वर्षासाठी पुन्हा Online प्रवेश-अर्ज भरून आपला प्रवेश निश्चित करणे अनिवार्य आहे. दुसऱ्या वर्षी आपला बी.एड. प्रवेश पुन्हा निश्चित न करणारे विद्यार्थी दुसऱ्या वर्षाची अंतिम परीक्षा देण्यास अपात्र ठरतात, याची कृपया नोंद घ्यावी..

## (१३) शिक्षणाक्रमाचे विविध अभ्यासक्रम

### अ) प्रथम वर्ष

| **अ. क्र.** | **अनिवार्य अभ्यासक्रम**<br>(अधिष्ठान अभ्यासक्रम ) | **वैकल्पिक अभ्यासक्रम**<br>खालीलपैकी कोणतेही दोन विषय शालेय विषय (मेथड) निवडावेत. (प्रथम विषय पदवी स्तरावर अभ्यासलेला असावा. द्वितीय विषय आपण आपल्या आवडीनुसार घेऊ शकाल.) |
|---|---|---|
| १) | EDU 401 अध्ययनार्थी व त्याचा विकास | EDU 405 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : मराठी |
| २) | EDU 402 अध्ययन आणि अध्यापन | EDU 406 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : हिंदी |
| ३) | EDU 403 अभ्यासक्रमाची भाषा, विद्याशाखा व विषयाचे अत्मसातीकरण | EDU 407 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : इंग्रजी |
| ४) | EDU 421 मूल्यमापन आणि मूल्यनिर्धारण | EDU 408 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : संस्कृत |

| | | |
|---|---|---|
| ५) | | EDU 409 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : इतिहास |
| ६) | | EDU 410 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : भूगोल |
| ७) | | EDU 411 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : गणित |
| ८) | | EDU 412 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : विज्ञान |
| ९) | | EDU 413 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : अर्थशास्त्र |
| १०) | | EDU 414 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : हिशेबशास्त्र |

(एन.सी.टी.ई. नियम व विद्यापीठ धोरणांनुसार या रचनेत होणारा बदल सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक असेल)
**सूचना** - एकदा निवडलेली मेथड बदलता येत नाही याची नोंद घ्यावी.

## (ब) द्वितीय वर्ष

| अ.क्र. | अनिवार्य अभ्यासक्रम | वैकल्पिक अभ्यासक्रम (खालीलपैकी कोणताही एक विषय निवडावा) |
|---|---|---|
| १) | EDU422 उदयोन्मुख भारतीय समाज आणि शिक्षण | EDU 426 शैक्षणिक तंत्रविज्ञान |
| २) | EDU 423 लिंग, शाळा आणि समाज | EDU 427 बालक आणि बालशिक्षण (भाग - १ व भाग - २) |
| ३) | EDU 424 ज्ञान आणि अभ्यासक्रम | EDU 428 शिक्षक आणि स्वयं-साहाय्य गट (भाग- १ व भाग – २) |
| ४) | EDU 425 समावेशित शिक्षण | EDU 429 मूल्यशिक्षण |
| ५) | EVS 201 पर्यावरण अभ्यास (क्रेडिट कोर्स) | EDU 430 प्राथमिक शिक्षकांसाठी इंग्रजी |
| ६) | | EDU 433 शिक्षणातील संज्ञापन प्रकार |
| ७) | | EDU 434 प्राथमिक स्तरावरील शिक्षण व शिक्षकाची कार्ये |
| ८) | | EDU 435 माध्यमिक स्तरावरील शिक्षण व शिक्षकाची कार्ये |
| ९) | | EDU 436 शिक्षणाच्या बदलत्या भूमिका व कृतिशीलता |
| १०) | | EDU 437 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : विशिष्ट शालेय विषय |

(एन.सी.टी.ई. नियम व विद्यापीठ धोरणांनुसार या रचनेत होणारा बदल सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक असेल)
**सूचना** - एकदा निवडलेला वैकल्पिक विषय बदलता येत नाही याची नोंद घ्यावी.

**प्रात्यक्षिक कार्याबाबत**

| **प्रथम वर्षे प्रात्यक्षिक कार्य** | **द्वितीय वर्षे प्रात्यक्षिक कार्य** |
|---|---|
| सैद्धांतिक विषयाशी संबंधित प्रात्यक्षिके | सैद्धांतिक विषयाशी संबंधित प्रात्यक्षिके |
| स्वशोध क्षेत्राशी संबंधित प्रात्याक्षिके | सरावपाठ संबंधित प्रात्यक्षिके |
| नाट्य व कला क्षेत्राशी संबंधित प्रात्यक्षिक | संगणक संबंधित प्रात्यक्षिके |
| कृतिसंशोधन, पर्यावरण शिक्षण व योगा प्रात्यक्षिके | सहशालेय उपक्रम |
| वाचन व विमर्षण संबंधित प्रात्यक्षिके | शालेय व्यवहारांवरील विमर्षण |
| सैद्धांतिक विषयाशी संबंधित प्रात्यक्षिके | अंतरवासिता |
| आंतरवासिता | |

(एन.सी.टी.ई. नियम व विद्यापीठ धोरणांनुसार या रचनेत होणारा बदल सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक असेल).

**(१४) संपर्कसत्रे - रोज घड्याळी ६ तास याप्रमाणे**

| | |
|---|---|
| प्रथम वर्षे ३५ दिवस | द्वितीय वर्षे ३५ दिवस |

**(१४.१) संपर्कसत्र कार्यक्रम व त्यातील उपस्थिती** -शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रमाची भूमिका प्राधान्याने स्वयं—अध्यापनाची असली तरी हा व्यावसायिक शिक्षणक्रम असल्यामुळे तात्त्विक पाठ्यक्रमांचे मार्गदर्शन, आशयाचे शंकानिरसन, मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनानुसार प्रात्यक्षिके पूर्ण करणे, स्वाध्यायलेखनानंतर चर्चा, कृतिसत्रे, उद्बोधन, प्रबोधन, इत्यादींसाठी योजनाबद्ध संपर्कसत्रांची आवश्यकता आहे. ही संपर्कसत्रे विद्यापीठाच्या या शिक्षणक्रमाच्या नियोजित अभ्यासकेंद्रावर आयोजित केले जातात तेथेच विद्यार्थ्यांनी ते पूर्ण करणे बंधनकारक आहे. अभ्यासकेंद्रासाठी प्रामुख्याने राज्यातील प्रथितयश शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची निवड करण्यात आलेली आहे. विद्यापीठाने तयार केलेल्या वेळापत्रकानुसार या संपर्कसत्राचे आयोजन करण्यात येते. संपर्कसत्रातील छात्र-अध्यापकांची उपस्थिती व सहभाग त्यात अनिवार्य असतो.

**(१४.२)** संपर्कसत्रांना अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक दिवसाला रु.५००/- याप्रमाणे विद्यापीठात ज्यादा शुल्क भरावे लागते. ज्यादा शुल्कातील ६० % रक्कम विद्यापीठात, तर ४० % रक्कम अभ्यासकेंद्रावर भरून त्याची पावती विद्यार्थ्याने घेणे अपेक्षित असते. त्यानंतर विद्याशाखेच्या मान्यतेनुसार नियुक्त अभ्यासकेंद्रावर अपूर्ण संपर्कसत्र पूर्ण करणे अनिवार्य असते. अपूर्ण संपर्कसत्र त्याच वर्षी किंवा पुढील तुकडीच्या संबंधित संपर्कसत्राबरोबर पूर्ण करता येते. सर्व संपर्कसत्र पूर्ण झाल्याशिवाय विद्यार्थी अंतिम परीक्षेला पात्र ठरत नाही. काही छोटी संपर्कसत्रे केंद्राने आयोजित केल्यास त्यास प्रशिक्षणार्थीना रजा घेऊन उपस्थित राहावे लागते. त्याबद्दल कोणतीही तक्रार विचारात घेतली जात नाही.

**सूचना -** प्रवेश निश्चितीनंतर येणाऱ्या पहिल्या मोठ्या सुट्टीत आपले प्रथम मोठे संपर्कसत्र असेल. आपल्या नियोजित अभ्यासकेंद्राकडून संपर्कसत्रासाठी त्यासंदर्भात पत्र येणे आवश्यक असते. पत्र न आल्यास आपल्या नियोजित अभ्यासकेंद्रावर संपर्क साधावा. अर्थात त्यासाठी प्रवेशानंतर आठ दिवसांत आपले नाव, पत्रव्यवहाराचा पत्ता, फोन नंबर इ. बाबींची नोंद अभ्यासकेंद्रावर नोंद होणे आवश्यक असते.

**(१४.३) परीक्षेचे माध्यम** — प्राथमिक कार्य व लेखी परीक्षेसाठी इंग्लिश विषयासाठी माध्यम इंग्लिश, हिंदी विषयासाठी माध्यम हिंदी व इतर विषयांसाठी माध्यम मराठी राहील. इतर सर्व अभ्यासक्रम लेखी परीक्षा व

अभ्यासकार्ये मराठी भाषेतूनच पूर्ण करावी लागतील. (अपवाद इंग्रजी व हिंदी माध्यमातून लेखन व अंतिम परीक्षेसाठी पूर्वपरवानगी घेणारे विद्यार्थी). प्रश्नपत्रिका मराठी आणि इंग्रजी ह्या दोन्ही माध्यमांत उपलब्ध असतील. मात्र मराठी भाषेतील प्रश्नपत्रिका प्रमाण मानण्यात येतील.

## (१५) अंतिम परीक्षेसाठी पात्रतेच्या अटी

विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रमाच्या अंतिम परीक्षेस पात्र होण्यासाठी अटी पुढीलप्रमाणे :

**(१५.१)** या शिक्षणक्रमाच्या सर्व संपर्कसत्रांना किमान ८० % उपस्थित राहून सर्व प्रात्यक्षिक कार्ये व्यवस्थित पूर्ण केल्याबद्दल एकत्रित असे अभ्यासकेंद्र -प्रमुखांचे प्रमाणपत्र छात्राध्यापकाने घेतले पाहिजे.

**(१५.२)** शिक्षणक्रमातील विद्यालयांतर्गत प्रात्यक्षिक कार्याची वेळापत्रकानुसार पूर्तता केल्याबद्दलचे एकत्रित असे विद्यालयप्रमुखाचे प्रमाणपत्र छात्राध्यापकाने घेऊन स्वतः जवळ ठेवावे.

**(१५.३)** संगणक प्रात्यक्षिक कार्य पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र संगणक केंद्र- प्रमुखाकडून छात्राध्यापकाने घेऊन स्वतःजवळ ठेवावे.

**(१५.४)** केंद्रावरील मौखिक परीक्षेस उपस्थित असल्याचे प्रमाणपत्र छात्राध्यापकाने घेऊन स्वतःजवळ ठेवावे.

**(१५.५)** अंतिम परीक्षेपूर्वी विद्यार्थ्याने सर्व संपर्कसत्रे व प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करावीत.

**(१५.६)** संपर्कसत्रे व प्रात्यक्षिके कार्य पूर्ण केलेले विद्यार्थीच परीक्षेसाठी पात्र असतील. त्या संदर्भातील खात्री केंद्रसंचालक व समन्वयक यांच्याकडून करून घ्यावी, प्रवेशित विद्यार्थ्याने नियोजित परीक्षेच्या पहिल्यावेळी परीक्षा-अर्ज भरू नयेत. मात्र पुनर्परीक्षार्थीने परीक्षा-अर्ज भरणे अनिवार्य आहे.

## (१६) विद्यार्थी मूल्यमापन

या शिक्षणक्रमात अंतर्गत व बहिस्थ असे दोन पद्धतीने मूल्यमापन करण्यात येते.

**अ)** सैद्धांतिक विषयातील अंतर्गत गुणांना ३० % भारांश, तर अंतिम लेखी परीक्षेस ७० % भारांश असतो. अंतिम परीक्षा प्रत्येक वर्षी साधारणत: मे महिन्यात आयोजित केली जाते, त्यात बदल होऊ शकतो.

**आ)** अंतर्गत कार्याचे मूल्यमापन अभ्यासकेंद्रामार्फत सातत्याने चालते. तसेच दरवर्षी मौखिक परीक्षाही आयोजित करून हे मूल्यमापन पूर्ण केले जाते.

### (१६.१) मूल्यमापनाचा तपशील



### (१६.२) उत्तीर्णतेचे नियम

**अ)** तात्त्विक भागात उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक लेखी परीक्षेत किमान  ४० % गुण आणि सर्व विषय मिळून किमान ५० % गुण अनिवार्य असतील.

**आ)** प्रात्यक्षिक भागात उत्तीर्ण होण्यासाठी प्रात्यक्षिक कार्यात किमान ५० % गुण अनिवार्य असतील.

**इ)** अध्यापक तात्त्विक भागात तसेच प्रात्यक्षिक भागात उत्तीर्ण झाला तरच तो या शिक्षणक्रमाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्याचे जाहीर करण्यात येईल.

**ई)** अंतिम श्रेणी ही तात्त्विक व प्रात्यक्षिक या दोन्ही भागांवर आधारित असेल व विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे ती निश्चित होईल.

**उ)** प्रात्यक्षिक गुणांवर 'स्केलिंग डाऊन' (प्रमाणीकरण) योजनेनुसार प्रक्रिया करण्यात येईल. अभ्यासकेंद्रावरून प्राप्त झालेले प्रात्यक्षिकाचे गुण जसेच्या तसे शिक्षणक्रमाच्या टक्केवारीसाठी धरण्यात येणार नाहीत. सैद्धांतिक भागात / अंतिम परीक्षेतील गुणांप्रमाणे त्याचे प्रमाणीकरण करण्यात येईल. प्रमाणीकरणात अंतिम परीक्षेत गुण आणि प्रात्यक्षिकात मिळालेले गुण यात १५ % पेक्षा जास्त फरक असेल तर प्रात्यक्षिकांचे गुण कमी करून तो फरक १५ % पर्यंत आणला जाईल. त्यानंतर सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक परीक्षेतील गुणांची मिळून अंतिम एकत्रित टक्केवारी काढण्यात येईल.

**ऊ)** अंतिम गुण श्रेणी पुढे दर्शविल्याप्रमाणे दिली जाते.

| **वर्ग** | **श्रेणी तपशील** | **ग्रेड पॉईंट** |
|---|---|---|
| 'ओ' | विशेष प्रावीण्य | १० |
| 'ए+' | अति उत्तम | ९ |
| 'ए' | उत्तम | ८ |
| 'बी+' | चांगला | ७ |
| 'बी' | सरासरीपेक्षा वर | ६ |
| 'सी' | साधारण | ५ |
| 'डी' | साधारण | ० |
| 'एफ' | साधारण | ० |

### १७. शिक्षणक्रम शुल्क

| **अ.क्र.** | **शुल्क तपशील** | **प्रथम वर्ष** | **द्वितीय वर्ष** |
|---|---|---|---|
| १) | विद्यापीठ शुल्क | रु. १५,३५०/- | रु. २१५० /- |
| २) | अभ्यासकेंद्र शुल्क | रु. १७,५००/- | |

### १७.१. विद्यापीठ शुल्काचे विभाजन –

| अ.क्र. | शुल्क विभाजन तपशील | शुल्क |
|---|---|---|
| १) | नोंदणी शुल्क | १००/- |
| २) | शिक्षण शुल्क | ३,५००/- |
| ३) | विकसन शुल्क | ९,४५०/- |
| ४) | परीक्षा व पदवी प्रमाणपत्र शुल्क | ४,३००/- |
| ५) | इतर शुल्क | १५०/- |
| ६) | एकूण शुल्क | **१७,५०० रू.** |

### १७.२. अभ्यासकेंद्र शुल्काचे विभाजन

| अ.क्र. | शुल्क विभाजन तपशील | शुल्क |
|---|---|---|
| १) | मूल्यशिक्षण प्रात्यक्षिक व साहित्य शुल्क | ६००/- |
| २) | संगणक प्रात्यक्षिक शुल्क | ६००/- |
| ३) | ग्रंथालय व विकासनिधी शुल्क | १,००० /- |
| ४) | संमंत्रण व इतर शुल्क | १५,३००/- |
| | **एकूण** | **१७,५००/-** |

एकदा भरलेल्या शुल्कातील कोणतेही शुल्क कोणत्याही कारणास्तव आपणास परत केले जाणार नाही. याव्यतिरिक्त आपापल्या अभ्यासकेंद्रावर तेथील ग्रंथालय नियमानुसार अनामत रक्कम आपणास भरावी लागेल. ती मात्र शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर आपणास अभ्यासकेंद्रांवरून परत करण्यात येईल. त्याचीही रीतसर पावती अभ्यासकेंद्रांवरून मिळेल. या व्यतिरिक्त कोणत्याही स्वरूपाचे शुल्क किंवा रक्कम अभ्यासकेंद्राकडून घेतली जाणार नाही. अभ्यासकेंद्राकडून पावती न मिळाल्यास किंवा अतिरिक्त रक्कम घेतल्यास विद्यापीठाकडे लेखी तक्रार करावी.

**महत्त्वाचे** – प्रवेशानंतर या पुस्तिकेत दिलेल्या सर्व नियम व अटी प्रवेशित विद्यार्थ्यास बंधनकारक असतील याची नोंद घ्यावी.

**१८. विभागनिहाय व जिल्हानिहाय अभ्यासकेंद्रे -** विद्यापीठाच्या या पदवी शिक्षणक्रमासाठी एन.सी.टी.ई. मान्यता असणारी एकूण ३५ अभ्यासकेंद्रे आहेत, प्रत्येक जिल्ह्याला एक याप्रमाणे त्यांची विभागणी आहे. पालघर जिल्ह्यासाठी मात्र स्वतंत्र अभ्यासकेंद्रे एन.सी.टी.ई. कडून अद्याप प्राप्त नसल्याने पालघर व ठाणे या दोन जिल्ह्यांचे मिळून ठाणे जिल्ह्यात उल्हासनगर येथे एकच अभ्यासकेंद्र आहे. मुंबई विभागातील मुंबई (उपनगर) – यात कुर्ला, बोरिवली आणि अंधेरी तालुक्यांचा समावेश होतो त्यांच्यासाठी चेंबूर येथे अभ्यासकेंद्र आहे. मुंबई शहरात सेवा करणाऱ्यांसाठी एस.टी. शिक्षणशास्त्र महाविद्यालय धोबीतलाव येथे अभ्यासकेंद्र आहे. तसेच रायगड जिल्ह्यासाठी पनवेल येथे स्वतंत्र अभ्यासकेंद्र आहे.

इतर जिल्ह्यांप्रमाणेच मुंबई विभागातील उमेदवारांनीही आपण मुंबईच्या ज्या भागात सेवा करतो त्याच विभागातील अभ्यासकेंद्रे निवडणे बंधनकारक आहे. ती निवड चुकली अथवा एकापेक्षा जास्त केंद्रावर प्रवेश-अर्ज

भरला तर प्रवेश मिळणार नाही . चुकून प्रवेश झाला तर तो रद्द करण्यात येईल व आपण भरलेले शुल्कही परत केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

मुंबई तसेच इतर कोणत्याही विभागात एखाद्या जिल्ह्यात प्रवेश-अर्जाअभावी नियोजित संख्येपेक्षा कमी प्रवेश झाल्यास त्या जिल्ह्याच्या रिक्त जागा उर्वरित जिल्ह्यात समान वाटप करण्यात येतील. त्या जिल्ह्यात त्या जागा गुणवत्तेनुसार अतिरिक्त भरण्यात येतील.

| अ. क्र. | विभागीय केंद्र नाव | जिल्ह्याचे नाव | अभ्यासकेंद्राचा पत्ता व दुरध्वनी | अभ्यासकेंद्र संकेतांक |
|---|---|---|---|---|
| (1) | यचममुवि. विभागीय केंद्र अमरावती व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही, नवसारी अमरावती – ४४४ ६०४ दु.क्र:(०७२१) २५३१४४५, २५३१२१० | अकोला | शासकीय अध्यापक महाविद्यालय रामदास पेठ, अकोला दु.नं. (०७२४) २४३३७६५ | 1121A |
| | | अमरावती | शिवाजी शिक्षण संस्थेचे शिवाजी कॉलेज ऑफ एज्युकेशन, शिवाजीनगर डॉ. पंजाबराव देशमुख चौक अमरावती – ४४४ २१४ दु.नं. (०७२१) २६६२१४२ | 1250A |
| | | बुलढाणा | शासकीय अध्यापक महाविद्यालय, चिखली रोड बुलढाणा - ४४३ ००१ दु.नं. (०७२६२) २४४३४२ | 1302A |
| | | यवतमाळ | शासकीय अध्यापक महाविद्यालय, गोधनी रोड, उमरसा यवतमाळ – ४४५ ००१ दु.नं. (०७२३२) २४४३४२ | 1404A |
| | | वाशीम | छबुताई डहाके शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कारंजा (लाड), जि. वाशीम दु.नं. (०७२५६) २२३६१२ | 1504A |
| (2) | यचममुवि. विभागीय केंद्र औरंगाबाद.सर्व्हे नं. 41, सैनिकी मुलींच्या वसतिगृहाच्या पूर्वेस संदनवन कॉलनी, छावणी, औरंगाबाद – ४३१ ००२ दु.क्र. (०२४०) २३७१०६६,२३७१०७७. | औरंगाबाद | शासकीय अध्यापक महाविद्यालय, स्टेशन रोड, औरंगाबाद दु.नं. (०२४०) २३३४८४० | 2101A |
| | | बीड | शासकीय अध्यापक महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड – ४३१ २०४ दु.नं. (०२४४६) २४७०५६ | 2203A |
| | | जालना | मत्सोदरी कॉलेज ऑफ एज्युकेशन, मत्सगड, जालना – ४३१ २०४ दु.नं. (०२४८२) २३५९३७ | 2303A |
| | | उस्मानाबाद | स्वामी विवेकानंद संस्थेचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद – ४१३ ५०१ दु.नं. (०२४७२) २२२०५८ | 2601A |
| (3) | यचममुवि. विभागीय केंद्र मुंबई जगन्नाथ शंकरशेठ महानगरपालिका शाळेची इमारत, दुसरा मजला फ्रेअर ब्रीज (साउथ एन्ड) नाना चौक, ग्रँट रोड (पश्चिम) मुंबई – ४०० ००७ दु.क्र. (०२२) २३८७४१८०, २३८७४१८३, २३८७४१७७. | मुंबई (उपनगर) | चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय, राधाकृष्ण चेंबूर मार्गसमोर, चेंबूर नाका चेंबूर, मुंबई – ४०० ०७१ (उपनगर) दु.नं.(०२२) २५२२१४३९ | 3102A |
| | | मुंबई | सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज ऑफ एज्युकेशन ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव मेट्रो सिनेमा, मुंबई – ४०० ००१ दु.न. (०२२) २२६२००५० | 31139 |
| | | रायगड | शासकीय अध्यापक महाविद्यालय, पुणे-मुंबई हायवे, पनवेल, जि. रायगड – ४१० २०६ दु.नं. : (०२२) २७४५३००० | 3213A |
| | | ठाणे व पालघर | सेवासदन कॉलेज ऑफ एज्युकेशन, सेन्ट्रल हॉस्पिटल समोर, सेवासदन मार्ग, उल्हासनगर, जि. ठाणे - ४२१ ००१ दु.नं. (०२५१) २५४५५६५ | 3501A |
| (4) | यचममुवि. विभागीय केंद्र नागपूर सुभेदार हॉल, विद्यापीठ क्रीडा परिसर लॉ कॉलेज कॅम्पस, रविनगर चौकाजवळ, अमरावती रोड, नागपूर – ४४० ००१ | भंडारा | शासकीय अध्यापक महाविद्यालय, भंडारा –४४१ ९०४ दु.नं. (०७१८४)२५२३८६ | 4102A |
| | | गोंदिया | पुंजाभाई पटेल कॉलेज ऑफ एज्युकेशन, डॉ. आंबेडकर वार्ड, गोंदिया – ४४१६०१ दु.नं. (०७१८२) २२२५०८, २३१६९८ | 4104A |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | दु.क्र.(०७१२)२५५३७२४,<br>२५५३७२५ | चंद्रपूर | जनता कॉलेज ऑफ एज्युकेशन, सिव्हील लाईन्स,<br>चंद्रपूर – ४४२४४१<br>दु.नं. (०७१७२) २५८७२२, २५५२९२ | 4220A |
| | | गडचिरोली | शिवाजी एज्युकेशन सोसायटीचे ॲड. एन. एस. गंगुवार कोलेज ऑफ एज्युकेशन,गडचिरोली – ४४२ ६०५<br>दु.नं. : (०७१३२) २३३४५३ | 4302A |
| | | नागपूर | राधिका अध्यापक महाविद्यालय, नवोदय विद्यालय बिल्डिंग, राजीवनगर सोमलवाडा,<br>नागपूर – ४४० ०२५ दु.नं. : (०७१२) २२९१६८२ | 4484A |
| | | वर्धा | स्वावलंबी कॉलेज ऑफ एज्युकेशन,<br>वर्धा – ४४२ ००१ दु.नं. : (०७१५२) २४३८०४ | 4501A |
| (5) | यचममुवि. विभागीय केंद्र नाशिक, महानगरपालिकेची जुनी इमारत दुसरा मजला, नवीन पंडित कॉलनी,<br>नाशिक – ४२२ ००२<br>दु.क्र. (०२५३)२३१७०६३ | अहमदनगर | विद्याप्रतिष्ठानचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, केडगाव देवी रोड, अहमदनगर – ४१४ ००१<br>दु.नं. : (०२४१) २५५१४२० | 5116A |
| | | धुळे | धुळे एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, डॉ. लोहिया मार्ग, एस.आर.पी. कॅम्पजवळ,<br>धुळे – ४२४ ००१ दु.नं. : (०२५६२) २३८०४२ | 5201A |
| | | जळगाव | खान्देश एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, एम.जे. कॉलेज परिसर<br>जळगाव – ४२५ ००१ दु.क्र. : (०२५७) २२३४१८७ | 5310A |
| | | नाशिक | एन.डी.एम.व्ही.पी.चे कॉलेज ऑफ एज्युकेशन, के.टी.एच.एम. कॉलेज कॅम्पस, गंगापूररोड,<br>नाशिक – ४२२ ००२ दु.क्र. : (०२५३) २५७१५४२ | 5401A |
| | | नंदुरबार | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नंदुरबार<br>दु.क्र. : (०२५६४) २२२५०८ | 5507A |
| (6) | यचममुवि. विभागीय केंद्र पुणे, शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह महानगरपालिका शाळा क्र.५ (मुलांची), ६५४, सदाशिव पेठ हौदासमोर, कुमठेकर मार्ग<br>पुणे – ४११ ०३०<br>दु.क्र. (०२०)२४४५७९१४ | पुणे | झेल एज्युकेशन सोसायटी संचालित ज्ञानगंगा कॉलेज ऑफ एज्युकेशन, सर्व्हे नं. २५/३/३ हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०९१ | 62395 |
| | | सातारा | आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन कॅम्प, सातारा – ४१५ ००१ दु.क्र. : (०२१७) २३१२५७ | 6401A |
| | | सोलापूर | दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन,<br>सोलापूर – ४१३ ००२ दु.क्र. : (०२१७) २३७३२३७ | 6502A |
| (7) | यचममुवि. विभागीय केंद्र कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ परिसर पोस्ट ऑफिस शेजारी, विद्यानगर कोल्हापूर – ४१६ ००४<br>दु.क्र. (०२३१) -२६०७०२२ | सांगली | सांगली शिक्षण संस्थेचे एस.पी.एस. कॉलेज ऑफ एज्युकेशन, राजवाडा, सांगली – ४१६ ४१६<br>दु.नं. : (०२३३) २३७३८४८ | 7254A |
| | | रत्नागिरी | शासकीय अध्यापन महाविद्यालय बोर्डिंग रोड,<br>रत्नागिरी – ४१५ ६१२ दु.नं. : (०२४५२) २२४६५० | 7301A |
| | | सिंधुदुर्ग | शिक्षण विकास मंडळाचे श्री. एस.के. पंतवालावलकर कॉलेज ऑफ एज्युकेशन, देवगड, जि. सिंधुदुर्ग<br>दु.नं. : (०२३६४) २६२१९४ | 7403A |
| | | कोल्हापूर | आचार्य जावडेकर अध्यापक महाविद्यालय, गारगोटी, जि. कोल्हापूर दु.नं. : (०२३२४) २२००७९ | 7515A |
| (8) | यचममुवि. विभागीय केंद्र नांदेड, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसर,नानक कमान, झरी | लातूर | वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय, शिरूर ताजबंद, ता. अहमदपूर, जि. लातूर<br>दु.नं. : (०२३८१) २२०२९० | 8416A |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | रोड,विष्णुपुरी नांदेड - ४२१ ६०६<br>दु.क्र. (०२४६२)२२९९४०, २८३०३८ | नांदेड | शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड – ४३१ ६०१<br>दु.नं. : (०२४६२) २२९३२८ | 8502A |
| | | परभणी | शासकीय अध्यापक महाविद्यालय, जिंतूर रोड, परभणी<br>दु.नं. : (०२४५२) २२४००१५ | 8702A |
| | | हिंगोली | प्रियदर्शनी सेवा संस्थेचे डॉ. शंकरराव सानव शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कळमनुरी,<br>जि. हिंगोली –४३१७०२ दु.नं. : (०२४५५) २२००३७ | 8810A |

**टीप-** विद्यापीठाने प्रवेश देतेवेळी दिलेले अभ्यासकेंद्र काही कारणांमुळे कार्यान्वित होऊ शकले नाही, तर पर्यायी व्यवस्था करण्यात येईल. त्या ठिकाणी संबंधित विद्यार्थ्यांनी शिक्षणक्रम पूर्ण करणे सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

## (१९) विशेष नोंदी

बी.एड. शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यानंतर प्रवेशित विद्यार्थ्यांनी पुढील बाबी लक्षात ठेवाव्यात.

**(१९.१)** प्रवेशार्थीने प्रवेशाच्या वेळी निवडलेल्या विषयात कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यास मान्यता देण्यात येणार नाही. कोणी बदल केला व त्यामुळे निकालात चूक झाल्यास त्यास विद्यार्थी जबाबदार असेल.

**(१९.२)** नावातील स्पेलिंग अथवा देवनागरी अक्षरातील चुका विद्यार्थ्याने स्वतः प्रवेशानंतर त्याला त्याची माहिती संपादन करण्यास मिळणाऱ्या वेळेत दुरुस्त करणे अनिवार्य असेल.

**(१९.३)** जिल्हानिहाय आरक्षण व प्रवेश गुणवत्तायाद्या तयार होत असल्याने एकदा दिलेले अभ्यासकेंद्र बदलून दिले जाणार नाही. अध्यापकास संपूर्ण शिक्षणक्रम आपल्या नियोजित अभ्यासकेंद्रावरच पूर्ण करावा लागेल. केवळ बदली झाल्यास केंद्रबदल अर्ज करावा. तो अर्ज मूळ केंद्र व नवीन केंद्र यांच्या ना हरकत प्रमाणपत्रासह असावा. सोबत बदली आदेशाची प्रत जोडावी, अर्थात या परिस्थितीत संबंधित विद्यार्थ्याला दोन्ही अभ्यासकेंद्रावर संपूर्ण अभ्यासकेंद्र शुल्क भरणे अनिवार्य असेल बदली व्यतिरिक्त या संदर्भात येणा-या अर्जांची कोणत्याही प्रकारची दखल घेतली जाणार नाही.

**(१९.४)** एकदा प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेश रद्द करण्यात येणार नाही. तशा प्रकारच्या पत्रव्यवहाराची दखलही घेतली जाणार नाही. तथापि, एखाद्या विद्यार्थाचे नियोजित दोन वर्षांच्या कालावधीत दुःखद निधन झाले असेल तर त्याच्या वारसास रीतसर कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर (मृत्यू प्रमाणपत्र व शुल्क पावती) प्रशासकीय खर्च वजा करून ८० % शुल्क परत करण्यात येईल. विद्यापीठास पत्र पाठवताना विद्यार्थ्याने आपला शिक्षणक्रम, अभ्यासकेंद्र, कायम नोंदणी क्रमांक, तुकडी इ.चा उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच ते पत्र संबंधित विभागाला पाठवून प्रत माहितीस्तव संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांचे नावे पाठवावी.

## (२०) संपर्कासाठी पत्ते -

आपल्याला आलेल्या अडचणी सोडविण्यासाठी संबंधित अधिकारी / विभागास संपर्क करणे आवश्यक असेल. यासाठी विद्यापीठाच्या http://ycmou.digitaluniversity.ac या वेबसाईटवर दिलेले मेल आयडी / दुरध्वनी क्रमांकांचा उपयोग करावा.

विद्यापीठातील अधिकारी विविध कामात कार्यरत असल्याने अथवा संपूर्ण महाराष्ट्रातून येणाऱ्या दुरध्वनीमुळे तुमचा फोन लागत नाही. अशावेळी मोबाईल मॅसेज, अथवा व्हॉटसअपवर मेसेज न टाकता, मेलद्वारे संपर्क साधावा. मेल आयडी विद्यापीठाच्या वेबसाईटवर देण्यात आले आहेत. विद्यापीठ संकेतस्थळ http://ycmou.digitaluniversity.ac

**संपर्कासाठी संबंधित विभागप्रमुखांचे पत्ते -**
( विद्यापीठ **फोन नं. - ०२५३ — २२३१७१४**, 2231472, **२२३०२२७ फॅक्स नं. -९२ -०२५३ - २२३१७१६** )

| | |
|---|---|
| **नोंदणी संदर्भातील समस्या**<br>मा. प्रमुख, नोंदणी कक्ष,<br>**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**<br>**ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक. ४२२ २२२** | **व्यवस्थापकीय समस्या**<br>मा. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग<br>**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**<br>**ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- ४२२ २२२** |
| **शैक्षणिक समस्या**<br>मा. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा /<br>समन्वयक बी.एड. शिक्षणक्रम<br>**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**<br>**ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक. ४२२ २२२**<br>0253 -2231472 | **पुस्तकासंदर्भात**<br>मा. भांडारप्रमुख,<br>**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**<br>**ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- ४२२ २२२** |
| **न्यायालयीन / प्रवेशासंदर्भातील अडचणी / तक्रारी**<br>मा. कुलसचिव,<br>**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**<br>**ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक. ४२२ २२२** | **परीक्षासंदर्भात**<br>**मा. परीक्षा नियंत्रक,**<br>**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**<br>**ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- ४२२ २२२** |

**महत्त्वाचे —**

विद्यापीठाशी करावयाच्या पत्रव्यवहार पोस्ट/स्पीड पोस्टनेच करावा. Whatsapp अथवा कुरियरमार्फत करू नये. त्याची दखल घेण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

## भाग III - बी.एड. प्रवेशप्रक्रियेत संगणकाचा वापर

**(२१) प्रास्ताविक :-**

आज माहिती तंत्रज्ञानाच्या युगात कामात पारदर्शकता, अचूकता राहावी म्हणून अचूक, पारदर्शक कामकाजासाठी संगणकाचा वापर सर्वच क्षेत्रात वाढलेला दिसतो. तसाच तो शिक्षणाच्या क्षेत्रातही वढलेला आहे. विद्यापीठाचा बी.एड. शिक्षणक्रम ही त्याला अपवाद नाही. संगणक व आंतरजाल (इंटरनेट) जोडणीद्वारे माहितीची देवाण-घेवाण सर्वच स्तरावर होत असल्याने शिक्षकांना संगणक म्हणजे काय, आंतरजाल (इंटरनेट) किंवा वेबसाईट म्हणजे काय हे सांगण्याची गरज नाही. बी.एड. प्रवेश प्रक्रिया कमी वेळात पूर्ण होण्यासाठी विद्यापीठानेही प्रवेशप्रक्रिया ऑनलाईन केली आहे.

**(२२) बी.एड.प्रवेशप्रक्रियेत माहिती तंत्रज्ञानाचा वापर :-**

**सदर बी.एड. प्रवेश प्रक्रियेचा ओघ पुढील तक्त्याप्रमाणे आहे -**

## प्रवेशासंदर्भातील फ्लो चार्ट

ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे
(ऑनलाईन भरलेल्या प्रवेश अर्जाची प्रथम प्रिंट घेणे सुविधा)
↓
प्रवेश अर्ज भरणे मुदत संपल्यावर प्रवेशार्थीना तीन दिवस माहिती संपादनासाठी (बदल केल्यास नवीन द्वितीय प्रिंट घेणे )प्रवेश अर्ज उपलब्ध
↓
कागदपत्र सत्यता तपासणीसाठीची यादी प्रसिद्ध (वेळापत्रकासह)
↓
दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे विभागीय केंद्रावर अर्ज तपासणी
↓
सर्व अर्ज तपासणीनंतर तात्पुरती गुणवत्ता यादी Provisional merit list प्रसिद्ध
↓
२ दिवस तक्रार नोंद करण्यासाठी अवधी
↓
अंतिम निवड यादी
↓
विभागीय केंद्रावर / विद्यापीठात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज प्रमाणिकरण अंतिम प्रवेश व शुल्क भरणे
↓
प्रवेश निश्चिती
↓
उर्वरित जागांसाठी द्वितीय गुणवत्ता यादी जाहीर
↓

↓ अभ्यासकेंद्रावर जाऊन शुल्क भरणे.

↓ प्रवेश पूर्ततेनंतर नोंदणी विभागाकडून कायम नोंदणी क्रमांक देणे.

**(प्रवेशसंदर्भात प्रत्येक टप्प्यानुसार कार्यवाही वेळापत्रक वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर टाकण्यात येईल.)**

**२३ ) बी.एड प्रवेश अर्ज भरण्याविषयी -**

बी.एड. शिक्षणक्रमाला प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे अनिवार्य आहे. आपण स्वत: विद्यापीठाच्या वेबसाईटच्या माध्यमातून हा अर्ज भरू शकता. गरज पडल्यास माहीतगार व्यक्ती किंवा सायबर कॅफेची मदत घेऊ शकता. अर्ज भरताना आपण आपला स्वत:चा मोबाइल नंबर व मेल आय.डी. टाकणे आवश्यक आहे. सदर मोबाइल नंबरवरच आपणास बी.एड. Online प्रवेश अर्ज भरण्यासाठीचा OTP (One Time Password) तसेच प्रवेश प्रक्रियेसंबधित संदेश (Messages) पाठविले जातील. लॉगीन आय.डी. आणि पासवर्ड हा मोबाईलवर पाठविला जातो. तुम्ही नोंदविलेला मोबाईल क्रमांक हा DND (Do Not Disturb) येथे नोंदविलेला नसावा. अन्यथा संदेश ( Messages) आपल्यापर्यन्त मिळण्यास बाधा येऊ शकते. दुस-या कोणाचा मोबाईल क्रमांक दिल्यास ही माहिती इतरांपर्यंत पोहचू शकते व त्याचा दुरूपयोग होऊ शकतो. तसे झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवाराची असेल.

ज्या संगणकावरून आपण ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणार आहात त्या संगणकाला इंटरनेट, प्रिंटर व स्कॅनर (फोटो व सही स्कॅनिंगगसाठी) ह्या सुविधा आवश्यक आहेत.

**प्रवेश अर्ज भरण्यासाठीच्या प्रक्रियेतील टप्पे -**

१) प्रथमत: विद्यापीठाची वेबसाईट http://ycmou.digitaluniversity.ac वर जाऊन आपल्या समोर आलेल्या पेजवरील Click hear for Admission to B.Ed. 2018-20 (शैक्षणिक वर्षे २०१८-२० साठी बी.एड. शिक्षणक्रम प्रवेशासाठी येथे क्लिक करा.) यावर क्लिक करा.

२) यानंतर आपणास पुढीलप्रमाणे स्क्रिन दिसेल.




प्रवेश अर्ज भरण्यासाठी प्रत्येक अर्जदारास स्वतंत्र युजर नेम व पासवर्ड असणे आवश्यक आहे. तो आपण आधीच प्राप्त केलेला असल्यास पेजच्या वरील भागातील उजव्या बाजूस असलेल्या **login** या बटणावर क्लिक करून आपण उर्वरित अर्ज भरू शकता. परंतु युजर नेम व पासवर्ड प्राप्त करण्यासाठी आपल्याला पेजच्या वरील भागातील डाव्या बाजूस असलेल्या **Register** या बटणावर क्लिक करावे लागेल. त्यानंतर आपणास पुढील स्क्रिन दिसेल.



ऑनलाईन नोंदणीसाठी अटी आणि शर्ती या पानावर आहेत. बी.एड. प्रवेशासाठी एकत्रित केल्या जाणाऱ्या माहितीच्या वापराबद्दल काही अटी असतील. त्या काळजीपूर्वक वाचून व समजून घेतल्यावर पुढे जाण्यासाठी या सूचनांच्या तळाशी असणाऱ्या **‘Accept’** या बटणावर क्लिक करा. त्यानंतर आपणाला पुढील स्क्रिन दिसेल.




वरील स्क्रिनमध्ये आपणास चार प्रश्न विचालेले आहेत. ते प्रश्न प्रवेशासाठीच्या किमान पात्रतेशी संबंधित आहेत. ही पात्रता एन.सी.टी.ई ने निर्धारित केलेली असल्याने ती अर्जदारांनी धारण केलेली असणे अनिवार्य आहे. वरील पात्रता नसल्यास आपण बी.एड. प्रवेशासाठी पात्र नाही हे लक्षात घ्यावे, तसा संगणकाच्या स्क्रिनवर मेसेज दिसेल. आपण पात्र असल्यास सर्व प्रश्नांची उत्तरे होय अशी दिल्यानंतर Next ह्या बटणावर क्लिक करा. आपणास पुढील स्क्रिन दिसेल.




येथे आपण यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी विद्यार्थी असाल म्हणजेच दुसरा कोणताही शिक्षणक्रम या विद्यापीठातून पूर्ण केला असेल तर कायम नोंदणी क्रमांकांची (PRN) विचारणा केली जाते. सदरचा कायम नोंदणी क्रमांक १६ अंकी संख्येच्या रूपातच असणे गरजेचे आहे. जर आपली मुक्त विद्यापीठातील नोंदणी २००८ सालानंतर असेल तरच असा क्रमांक आपल्याकडे असेल. 2008 पूर्वी असा १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक नव्हता. आपल्याकडे असा १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक असेल तरच **‘Yes’** या बटणावर क्लिक करा. जर

आपण कधीच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी नसाल किंवा २००८ पूर्वी या मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी असला तर **'No'** या बटणावर क्लिक करा.

जर आपण **'Yes'** या बटणावर क्लिक केलेत तर, संगणक आपल्याला हा १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक विचारेल. दिलेल्या आयतात हा क्रमांक टाकून, **'Next'** या बटणावर क्लिक केल्यास. तुम्हाला पुढील स्क्रिन दिसेल.




आपण आता Search School UDise Code ह्या पानावर पोहोचाल. येथे आपण सध्या कार्यरत असलेल्या शाळेचा UDise Code कोड टाकावयाचा आहे. त्यानंतर Search School ह्या बटणावर क्लिक केल्यावर, तेथे तुम्हाला तुमच्या शाळेचे नाव व पत्ता दिसेल, तो बरोबर आहे, याची खात्री करून घ्या. तसेच त्या पानावर दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचून तुम्ही 'Confirm' ह्या बटणावर क्लिक केल्यास, तुम्हाला पुढील स्क्रिन दिसेल.




जर आपण आपला १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक भरला असेल, तर या ‘नोंदणी तपशिलाच्या पानावर काही माहिती आधीपासून भरलेली आहे, असे आपल्या लक्षात येईल. उदाहरणार्थ, आडनाव, नाव, मधले नाव, जन्मतारीख, भ्रमणध्वनी क्रमांक. यापैकी आपले आडनाव, नाव, मधले नाव व जन्मतारीख हे तपशील आपल्याला बदलता येणार नाहीत. आपला पत्ता व त्याचे तपशील तसेच भ्रमणध्वनी क्रमांक यामध्ये मात्र आपल्याला बदल करायचे असल्यास त्याची मुभा दिलेली आहे.

आपण १६ अंकी कायम नोंदणी क्रमांकास ‘No’ असे उत्तर दिलेले असल्यास, आपल्यासमोर ‘नोंदणी तपशील’ भरण्यासाठी पूर्णत: नवीन स्क्रिन येईल. आपण त्यात विचारलेल्या नाव, जन्मतारीख, आधार क्रमांक, पत्ता, मोबाईल नंबर व इ-मेल आय.डी.चा तपशील तेथे विचारलेल्या पध्दतीने दिलेल्या रकान्यात भरावा. त्यानंतर तुमच्या पसंतीनुसार व तुम्ही लक्षात ठेवू शकाल असा पासवर्ड तेथे टाकावा. सदर पासवर्ड त्यात कोणतीही तफावत न करता आपणास दिलेल्या दोन्ही रकान्यात टाकावयाचा आहे. त्यानंतर ‘Save and Proceed’ ह्या बटणावर क्लिक करा.

आता आपणास खालील स्क्रिन दिसेल. त्याच वेळेस आपल्या नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर मेसेजद्वारे आपणास OTP (One time password) प्राप्त होईल. त्यास कधी-कधी थोडा वेळही

लागू शकतो त्यामुळे मेसेज लगेच प्राप्त न झाल्यास थोडी वाट पाहावी. तरीही OTP प्राप्त न झाल्यास स्क्रीनवर दिलेल्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करावी.




आपणास प्राप्त झालेला OTP (One time password) वरील स्क्रिनमधील दिलेल्या रकान्यात भरा व **'Verify OTP '** ह्या बटणावर क्लिक करा. आता आपणास खालील स्क्रिन दिसेल.




स्क्रीनवर आपला Login ID दर्शविलेला दिसेल. तो पुढील वापरासाठी नोंद करून ठेवावा तसेच ह्या पेजवर दिलेल्या 'Print' ह्या बटणावर क्लिक करून प्रिंट ही काढून जपून ठेवा. Login ID व Password चा तपशील आपणास मोबाईल मेसेजद्वारे पाठविला जाईल. आता Next या बटणावर क्लिक करा. त्यानंतर आपणास पुढीलप्रमाणे स्क्रिन दिसेल.




या स्क्रीनवरील **Login ID व Password या रकान्यात** आपण **आपला Login ID व Password टाकून Login** ह्या बटणावर क्लिक करा. आता आपणास खालीलप्रमाणे स्क्रिन दिसेल. ह्या स्क्रिनवरील डाव्या बाजूला असलेल्या **'Application Menu'** मधील **Fill / Edit Application form** ह्या पर्यायावर क्लिक करा.




आता तुम्हाला पुढील स्क्रिन दिसेल. ह्या स्क्रिनवर **Gender** व **Category** संदर्भातील माहिती भरावयाची आहे.




**Category** संदर्भातील माहिती भरताना अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), विमुक्त जाती (VJ A), भटक्या जमाती (NT – B, NT – C, NT – D), विशेष मागास प्रवर्ग (SBC), इतर मागास प्रवर्ग (OBC) व खुला (Open) अशा प्रवर्गांच्या यादीतून आपण ज्या प्रवर्गात मोडता त्याची निवड करा. यापैकी जर आपण ST या प्रवर्गात मोडत असाल, तर आपल्याला जातवैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) मिळाल्याची तारीख तिथेच भरणे आवश्यक आहेत. त्यामुळे आपण ST हा प्रवर्ग निवडल्याबरोबर लगेचच तिथे ही तारीख भरण्याची सोय उपलब्ध होते तेथे सदर जातवैधता प्रमाणपत्र आपल्याला कधी मिळाले याची तारीख भरावी, जातवैधता प्रमाणपत्राच्या वरच्या उजव्या भागात ही तारीख असते. आपण जर ST प्रवर्गात मोडत असाल आणि Caste Validity Certificate नसल्यामुळे किंवा अन्य कारणांमुळे ही तारीख जर भरली गेली नाही, तर आपल्याला या प्रवर्गाचा फायदा मिळणार नाही व आपला अर्ज खुल्या प्रवर्गात धरला जाईल. ह्याबद्दल नंतर कोणतीही तक्रार करता येणार नाही.

त्याचप्रमाणे जर आपण VJ-A, NT-B, NT-C, NT-D, OBC किंवा SBC यांपैकी पर्यायाची निवड केलीत तर संगणक आपल्याला 'ना सायस्तर प्रमाणपत्र' मिळाल्याची तारीख विचारेल. तेथे बी.एड. २०१८ - २०२० प्रवेशासाठी वैध असलेल्या या प्रमाणपत्रातील **अंतिम वैधता दिनांक** टाकावा. जर आपण 'ना सायस्तर प्रमाणपत्र' मिळविले नसेल व त्यासाठी अर्ज केला असेल तर अर्जाच्या पावतीची तारीख भरावी. जर आपण VJ-A, NT-B, NT-C, NT-D, OBC किंवा SBC या प्रवर्गात असूनही ना सायस्तर प्रमाणपत्राची तारीख भरली नाही तर आपला अर्ज खुल्या प्रवर्गात धरला जाईल व याबद्दल नंतर कोणतीही तक्रार करता येणार नाही. प्रवेशाच्या वेळी आपल्याकडे 'ना सायस्तर' प्रमाणपत्र असायला हवे. Online प्रवेश अर्जात ना सायस्तर' प्रमाणपत्राची अंतिम वैधता दिनांक ०१.०४.२०१८ नंतरची असावी.

यानंतर तळाशी असणाऱ्या '**Next**' या बटणावर क्लिक करा. आता तुम्हाला पुढे दर्शविल्याप्रमाणे **शिक्षक म्हणून अध्यापनाच्या अनुभवाचा तपशील** या संदर्भातील स्क्रिन दिसेल. तेथे Add Experience details या बटणावर क्लिक केल्यावर आपल्याला पुढील स्क्रीन दिसेल.




**शिक्षक म्हणून अध्यापनाच्या अनुभवाचा तपशील** :- वरील स्क्रीनमध्ये तुमचा अध्यापन अनुभव तपशीलवार नोंदवावयाचा आहे. यामध्ये शाळेचे नाव, गाव, तारखांचा तपशील (सुरुवातीच्या तारखेपासून - अंतिम तारखेपर्यंत ) व सेवेचा प्रकार (पूर्णवेळ / अर्धवेळ) नोंदविणे अनिवार्य आहे. आपण शिक्षक म्हणून एकापेक्षा अधिक ठिकाणी सेवा केलेली असल्यास त्या प्रत्येक सेवा अनुभवाची माहिती विचारल्याप्रमाणे द्यावयाची आहे. पहिल्या शाळेतील अध्यापनाच्या अनुभवाचा तपशील नोंदविल्यानंतर "Save" बटण क्लिक करावे. त्यानंतर आपण नुकतीच भरलेली माहिती आपणास स्क्रीनवर खालील बाजूस window मध्ये दर्शविलेली दिसेल. त्यानंतर पुन्हा Add Experience details या बटणावर क्लिक करून दुसऱ्या शाळेतील अनुभवाचा तपशील नोंदवावा आणि "Save" बटण क्लिक करावे. स्क्रीनवर प्रत्येक सेवेचा तपशील भरल्यावर सेवेचा कालावधी दिवसांमध्ये दर्शविला जाईल. याप्रमाणे अनुभवाचा संपूर्ण तपशील नोंदविल्यानंतर शेवटी "Proceed" बटण क्लिक करा. यानंतर आपणास पुढील पानावर दर्शविल्याप्रमाणे स्क्रीन दिसेल.




या स्क्रिनवर तुम्हाला शाळेचा पत्ता , शाळेचे गाव/शहर, शाळेचा तालुका, पिनकोड तसेच पदवीधर वेतनश्रेणी (लागू असल्यास) याविषयीचा तपशील भरावयाचा आहे. या आधीच्या स्क्रिनवर शाळेचा UDISE क्रमांक टाकलेला असल्याने शाळेचे नाव व जिल्हा हा तपशील आपणास ह्या स्क्रिनवर दिसेल. त्यात तुम्हाला कोणताही बदल करता येणार नाही. फक्त विचारलेली उर्वरित माहिती आपणास येथे भरावी लागेल.

प्राथमिक शिक्षकांना पदवीनंतर देण्यात येणारी पदवीधर वेतनश्रेणी (Graduation Scale) आपल्याला लागू झाली आहे का? असा पुढचा प्रश्न संगणक विचारतो, जर नसेल तर 'No' हा पर्याय निवडा. जर आपल्याला पदवीधर वेतनश्रेणी लागू झाली असेल व त्या आदेशात **'पाच / सात वर्षात बी.एड. पूर्ण करणे अनिवार्य आहे'** असे म्हटले असेल, तरच 'Yes' हा पर्याय निवडा. (आपण जर दोन्हीपैकी काहीच निवडले नाही, तर आपल्याला पदवीधर वेतनश्रेणी लागू झालेली नाही असे गृहीत धरले जाईल याची नोंद घ्या.) जर तुम्ही 'Yes' हा पर्याय निवडला तर ही पदवीधर वेतनश्रेणी लागू होण्याची तारीख संगणक आपल्याला विचारेल, त्या ठिकाणी पदवीधर वेतनश्रेणी लागू झाल्याची तारीख टाका. सदर तारीख भरली नाही, तर आपणास पदवीधर वेतनश्रेणीचा फायदा प्रवेशासाठी मिळणार नाही. वरीलप्रमाणे सर्व माहिती भरून झाल्यास **Next** या बटणावर क्लिक करा.

आता तुम्हांला पुढे दर्शविल्याप्रमाणे **Educational Qualification details** (शैक्षणिक अर्हताविषयक) पुढील स्क्रीन दिसेल.




या ठिकाणी आपणास शैक्षणिक अर्हतेविषयीची सविस्तर माहिती द्यावयाची आहे. त्यात डी.एड./ डी.टी.एड., पदवी याविषयी तसेच आपणास लागू असल्यास पदव्युत्तर पदवी, अतिरिक्त पदव्युत्तर पदविका व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील विविध स्तरावरील पूर्ण केलेल्या शिक्षणक्रमांविषयी माहिती द्यावयाची आहे.

**Class obtained in one year degree or diploma, whose entry qualification is graduation (पदवी ही प्रवेशपात्रता असलेली एक वर्ष कालावधीच्या पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर पदविका शिक्षणक्रमात मिळालेला वर्ग) :**

ज्या शिक्षणक्रमाच्या प्रवेशाची **मूळ अर्हता पदवी शिक्षणक्रम पूर्ण असावा** अशी असेल त्याच शिक्षणक्रमांचा विचार ह्या सदरात येतो. आपण आपली मूळ पदवी प्राप्त केल्यानंतर त्या पदवीच्या आधारे जर एखादी पदव्युत्तर पदवी अथवा पदविका प्राप्त केली असेल, तर त्यात मिळालेल्या श्रेणीची माहिती आपणास पुढील पानावर दिलेल्या स्क्रीनमध्ये विचारलेल्या ठिकाणी द्यावयाची आहे. अशी पदव्युत्तर पदवी / पदविका आपणाकडे नसेल तर त्या ठिकाणी None हा पर्याय तसाच ठेवावयाचा आहे.

उदा. शालेय व्यवस्थापन, लोकसंख्या शिक्षण, प्रौढ शिक्षण, पर्यावरण इ. क्षेत्रातील पदवी / पदविका ह्यांचा यात समावेश होतो. जर आपण अशी अर्हता प्राप्त केलेली असेल, तर या पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर पदविकेत प्राप्त श्रेणीची दिलेल्या पर्यायांतून निवड करा. एकापेक्षा जास्त पदव्युत्तर पदवी / पदविका प्राप्त केलेल्या असल्यास केवळ सर्वोच्च गुण प्राप्त झालेल्या पदव्युत्तर पदवीबाबतचा येथे उल्लेख करा. प्रवेशासाठी बारावी ही आवश्यक अर्हता असलेला पदवी / पदविका शिक्षणक्रम या ठिकाणी ग्राह्य धरला जाणार नाही .

**Students passed from YCM Open University** (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून उतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी)

आपण जर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्र स्तरावरील एक किंवा अधिक शिक्षणक्रम पूर्ण केलेले असल्यास त्याविषयीची माहिती आपणास उपरोक्त स्क्रीनमध्ये द्यावयाची आहे. या पेजच्या वरील भागात आपण पदवी व पदव्युत्तर पदवी यांची माहिती भरताना जरी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणक्रमांविषयी नाव, श्रेणी, गुण ही माहिती भरलेली असेल **तरीही ती या सदरात पुन्हा भरावी.** ती संबंधित माहिती येथे भरल्यासच आपणास त्यासाठी असणारे गुण मिळतील अन्यथा आपणास सदरचे गुण मिळणार नाहीत.

जर आपण यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून एम.फिल., पीएच.डी. / पदव्युत्तर पदवी / पदवी / पदविका /प्रमाणपत्र शिक्षणक्रम यांसारखे शिक्षणक्रम पूर्ण केले नसतील तर ‘None’ हा पर्याय निवडावा. आपण उपरोक्त शिक्षणक्रम यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून यशस्वीरीत्या पूर्ण केले असतील तर त्या-त्या स्तरावरील शिक्षणक्रमाची निवड करा व संबंधित विचारलेली माहिती भरा. प्रत्येक स्तरावरील एकापेक्षा जास्त शिक्षणक्रम पूर्ण केलेले असल्यास त्या स्तरावरील एकाच शिक्षणक्रमासाठी लागू असणारे गुण ग्राह्य धरण्यात येतात. त्यामुळे एका स्तरावर एकापेक्षा अधिक शिक्षणक्रम पूर्ण केलेले असल्यास त्या स्तरावर कोणत्याही एकाच शिक्षणक्रमाची माहिती देणे अपेक्षित आहे. उदा. प्रमाणपत्र पातळीवर दोन प्रमाणपत्र शिक्षणक्रम पूर्ण केलेले असल्यास कोणत्याही एकाच प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची माहिती भरावी.

यानंतर या पानाच्या तळाशी असणाऱ्या ‘Next’ या बटणावर क्लिक करा. यानंतर तुम्ही उच्चत्तम अर्हतेच्या संबंधित पुढील स्क्रिनवर पोहोचाल.




या स्क्रिनमध्ये आपण आतापर्यंत प्राप्त केलेल्या उच्चत्तम अर्हतेविषयी अधिक माहिती विचारल्यानुसार भरावयाची आहे. सदर माहिती भरून झाल्यानंतर Next ह्या बटणावर क्लिक करा. त्यानंतर '**विशेष राखीव जागांच्या तपशिलाच्या**' (Special Reservation Details) या स्क्रिनवर पोहोचाल.




**Handicappedness (दिव्यांगत्व)** :- जर आपल्याला कोणत्याही प्रकारचे शारीरिक दिव्यांगत्व असेल तर आपण अल्पदृष्टी (Visually Impaired), कर्णबधिर (Hearing Impaired) व अस्थिव्यंग (Physically Handicapped) यापैकी लागू असलेला पर्यायासमोर क्लिक करा. तिथे बरोबरची (✓) खूण उमटेल.

**Freedom fighter/ Earthquake and Project Affected / Widow, Desserted, Divorcee (स्वातंत्र्यसैनिक / भूकंपग्रस्त / विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत)** :

आपण जर स्वातंत्र्यसैनिक (स्वातंत्र्यसैनिकाची पत्नी, पती, पुत्र, अविवाहित कन्या) असाल, भूकंपग्रस्त किंवा प्रकल्पग्रस्त असाल किंवा विधवा, परित्यक्ता अथवा घटस्फोटीत असाल तर आपण त्या त्या पर्यायांच्या आधी

असणाऱ्या छोट्या चौकोनांमध्ये क्लिक करा. तिथे बरोबरची (✓) खूण उमटेल. आपल्याला यापैकी एकापेक्षा जास्त मुद्दे लागू होत असतील तर तितक्या सर्व प्रकारांसाठी चौकोनांमध्ये आपण क्लिक करू शकता.

**Ex-Service-Man/Military Serviceman (माजी सैनिक / आजी सैनिक) :**

आपण जर माजी किंवा आजी सैनिकांचे पती, पत्नी, पुत्र किंवा अविवाहित कन्या असाल तर आपण लागू असलेल्या पर्यायासमोर क्लिक करा. अन्यथा None हा पर्याय निवडावा. दोन्ही पर्याय लागू असले तरीही कुठलाही एकच पर्याय निवडावा. यानंतर तळाशी असणाऱ्या 'Next' बटणावर क्लिक करा. यानंतर आपण 'Upload Photo & Signature' या स्क्रिनवर पोहोचाल.




